म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय

दा. क्र. 2832

BVBK-0402832

# गलिव्हरच्या सफरी

ह. भा. वाघोलीकर

किंमत रुपये पंधरा फक्त

BVBK-0402832

नितीन प्रकाशन, पुणे ३०

**प्रकाशक :**

नितीन वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
१४६४, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

© सर्व हक्क प्रकाशकाकडे

**चौथी आवृत्ती :** दिपावली सन १९९२

**मुद्रक :**

निगुडकर अँड असोसिएटस्
४८४/७ मित्रमंडळ कॉलनी
पुणे ९.



# छोट्या मानवांच्या लिलिपुटमध्ये

पहिली सफर

# छोटया मानवांच्या लिलिपुटमध्ये

केम्ब्रिजमध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी गलिव्हरने वैद्यकीच्या अभ्यासाला सुरुवात केली. महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च झेपण्याइतकी काही त्याच्या वडिलांची श्रीमंती नव्हती. म्हणून फावल्या वेळात गलिव्हर लंडनमधील प्रसिद्ध सर्जन जेम्स बेट्स् यांच्याकडे उमेदवारी करीत असे. बेट्स् यांच्याकडून मिळणारे पैसे आणि वडिलांकडून दरमहा येणारे पैसे यांतून खर्च भागवून उरलेल्या पैशांत गलिव्हरने गणितशास्त्र आणि नाविकशास्त्र याही विषयांचा अभ्यास केला. कॉलेजमधील चार

वर्षांचा अभ्यासक्रम संपला आणि गलिव्हर नॉटिंगहॅमशायरमध्ये परतला. त्याने त्यानंतर दोन वर्षे विज्ञानाचा अभ्यास केला. जेम्स वेट्स् यांच्या शिफारशीने 'स्वॅलो' या जहाजावर सर्जन म्हणून काम करण्याची त्याला संधी मिळाली. त्यानंतर तो ओल्ड् ज्यूरी या स्थळी स्थाईक झाला. त्याचा विवाहही झाला. डॉक्टर म्हणून तो व्यवसाय करू लागला. पण तो फारसा फलद्रूप होण्यांचे चिन्ह दिसेना. पुन्हा जहाजावर सर्जन म्हणून काम करण्याचे त्याने ठरविले. निरनिराळ्या जहाजांवर त्याने कामही केले आणि थोडीशी लक्ष्मीची कृपाही संपादन केली. कॅप्टन विल्यम यांच्या ॲन्टिलोप नावाच्या जहाजावर सर्जन म्हणून गलिव्हर दाखल झाला. हे जहाज दाक्षिण समुद्राच्या सफरीवर १६९९ च्या मे ४ ला ब्रिस्टलमधून निघाले.

आरंभाचा थोडासा प्रवास जरा शांततेचा, सुखाचा झाला. पण नंतर मात्र वादळाने चांगलाच तडाखा दिला. दूर आग्नेयेकडे जहाज फार वेगाने खेचले जाऊ लागले. त्याला आवरण्याच्या अती श्रमाने काही खलाशी मृत्युमुखी पडले. वादळ शिरजोर होऊ पाहत होते. जहाजावरची मनुष्यशक्ती मात्र कमजोर झाली होती. बिचारे खलाशी वाऱ्यावर वेगाने वाहावत जाणाऱ्या जहाजाला आवरू शकत नव्हते, आणि तेवढयाच गतीने जहाजावर आदळणाऱ्या लाटांना थोपवू शकत नव्हते. अखेर ते दुर्दैवी जहाज जोराने एकदम एका खडकावर फेकले गेले. जहाजाच्या पार ठिकऱ्या झाल्या. पण गलिव्हरचे नशीब शिकंदर म्हणून तो आणि त्याचे काही सहकारी एका छोट्या नावेच्या साहाय्याने जहाजातून अगोदर निसटले म्हणून थोडक्यात वाचले. त्यांची ती नाव लाटांवर काही काळ हेलकावत चालली होती. पण काळाला ते पाहवले नाही. एका उंच उसळलेल्या लाटेने ती नाव पार उलटीच्या पालटी करून टाकली. आपल्या सहकाऱ्यांचे काय झाले ह्याची काहीच कल्पना

गलिव्हरला आली नाही. तो मात्र आपले थकले-भागले शरीर कसेबसे पाण्यावर तरंगते ठेवीत पाण्याबरोबर वाहत चालला होता. अखेर तो इतका दमला की, त्याला हात-पाय हालविण्याचे त्राणच राहिले नाही. किनारा जवळ आला होता ह्या एकाच आशेने तो आपले पाय बळेच किनाऱ्याकडे ओढीत होता. अर्धा-एक मैल चाल झाली आणि अपरिचित किनाऱ्याला त्याचे पाय लागले. तसेच त्याने आपले शरीर किनाऱ्यावरच्या वाळूवर टाकले.

डोळे गपकन् मिटले ते दुसऱ्या दिवसाचा सूर्य बराच वर आल्यावर उघडले. गलिव्हरने उठण्याचा प्रयत्न केला, पण ते त्याला शक्य झाले नाही. त्याचे हात, पाय पार बांधून टाकले होते. केससुद्धा ताणून



जमिनीला बांधलेले होते. ह्या साऱ्या प्रकाराचा गलिव्हरला काहीच

उलगडा होईना. त्याला जमिनीशी इतके जाम केले होते की, मानसुद्धा इकडची तिकडे करता येत नव्हती. काहीतरी पायावर वळवळत होते. पण काय वळवळत आहे हे पाहण्याची सोयच नव्हती. हळूहळू ती वळवळ वाढतच चालली. पायाकडून मांडीकडे, मांडीवर, मांडीवरून पोटावर, छातीवर ही अज्ञात शत्रूची मोहीम पुढेपुढे सरकू लागली. अगदी छातीवरून गळ्याच्या खोबणीतून मोठ्या प्रयासाने वर चढून हा अज्ञात शत्रू त्याच्या हनुवटीवर येऊन उभा राहिला. त्याच्याकडे दृष्टी जाताच गलिव्हरच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

ती एक मनुष्याकृती होती. चालती बोलती जिवंत माणसासारखी माणसे होती ती. हाताच्या बोटाएवढी ती माणसे झुरळ चढल्याप्रमाणे गलिव्हरच्या अंगावर चढली होती. त्याच्या तोंडावर, कानापाशी, डोळ्यापाशी, नाकापाशी ती माणसे आली. नाकापाशी एक माणूस जास्तच डोकावून पाहू लागला तशी गलिव्हरला सटकन् शिंक आली आणि ती आठदहा छोटी माणसे एकदम दूर फेकली गेली. त्यामुळेच गलिव्हरच्या मानेला बांधलेल्या दोऱ्या तटकन् तुटल्या आणि त्याला थोडे इकडे तिकडे बघता आले. आपल्याभोवती त्या छोट्या मानवांची प्रचंड सेना जमली आहे असे त्याला दिसून आले. गलिव्हरच्या तोंडावर चढलेली माणसे खाली पडली, चेंगरली; हे पाहताच त्या माणसांनी त्याच्यावर असंख्य बाणांचा वर्षाव सुरू केला. बारीक टाचण्यांसारखे त्यांचे बाण गलिव्हरला हैराण करू लागले. काहींनी तर भाले फेकले त्याच्या अंगावर. पण हे सारे त्याने शांतपणे सहन केले; आणि म्हणूनच की काय ही एकतर्फी लढाई थांबली.

त्याच्या एका बाजूला त्या छोट्या माणसांनी एक उंच लाकडी स्टेज उभारले त्यावर उभा राहून एक उंची पोषाख केलेला माणूस, बहुतेक तो कोणीतरी अधिकारी असावा, बोलू लागला. अर्थात गलिव्हरला

त्यातले एक अक्षरही कळले नाही. नंतर स्वतः गलिव्हरने जरा सुटलेला आपला एक हात आपल्या पोटाकडे नेऊन आपल्याला भूक लागल्याचे त्याला सुचविले. आणि त्याच्या नशिबाने ते त्या अधिकाऱ्याला कळलेही असावे. कारण त्याने भराभर हुकूम सोडले. गलिव्हरच्याभोवती शिड्या लावण्यात आल्या. त्या छोटया शिडयांवरून ती छोटी माणसे अन्नाने भरलेली छोटी भांडी घेऊन येऊ लागली आणि त्याच्या तोंडात ती रिकामी करू लागली. किती तरी वेळ त्यांना हे काम पुरले. गलिव्हरची भयंकर भूक बघून ती माणसे थक्क झाली. नंतर त्यांनी त्याला काही पेय पाजले. तेही त्यांच्या दृष्टीने मोठमोठे रांजण त्यांनी त्याच्या तोंडात ओतले. ती माणसे लगबगीने येत-जात असता हाताने आठ-दहा माणसे पकडावीत असा त्याला मोह होई, पण त्यांनी केलेले आदरातिथ्य पाहून तो आपला मोह आवरीत असे.

गलिव्हर काही गडबड करीत नाही, अगदी शांतपणे सगळा पाहुणचार घेत आहे असे पाहून ती माणसे जरा धीट झाली. त्यांनी किनाऱ्यावरून गलिव्हरला आपल्या राजधानीत नेण्याचे ठरविले. शेकडो सुतार आणि मिस्त्री लावून बावीस चाकांची सात फूट लांब आणि चार फूट रुंद अशी एक गाडी त्यांनी तयार केली. आणि महाप्रयासाने त्यांनी गलिव्हरला त्या गाडीवर घेतले व राजधानीकडे चालविले. किनाऱ्यापासून राजधानीचे शहर अर्ध्या मैलावर होते. गलिव्हरला ज्या गाडीवर त्यांनी निजविले होते ती गाडी ओढण्यासाठी राजाचे सर्वांत मोठे, उत्कृष्ट असे पंधराशे घोडे आणले होते. ते घोडे साडेचार इंच उंच होते. गलिव्हरच्या बाजूने हजारो सशस्त्र सैनिक अगदी धनुष्याला बाण लावून चालले होते. हा अर्ध्या मैलाचा प्रवास संपवायला पूर्ण चोवीस तास खर्ची पडले. दुसऱ्या दिवशी सकाळी राजवाडयासमोर ही सारी मिरवणूक येऊन उभी राहिली.

तिथेच एक अतिप्राचीन असे मोठे देवालय होते. राजा आणि राणी गलिव्हरच्या स्वागतासाठी राजवाड्याबाहेर आले होते. गलिव्हरचा तो अजस्त्र देह पाहून राणी तर बेशुद्धच झाली. राजाच्या आज्ञेप्रमाणे गलिव्हरला त्या देवळात ठेवावयाचे ठरविण्यात आले. त्या देवळाचे दार चार फूट उंचीचे असल्याने गलिव्हरला सरपटत का होईना त्यामध्ये सहज जाता आले असते. त्या देवळाच्या आतील सभामंडपाला खिडक्या होत्या. त्यांना साखळ्या लावून गलिव्हरच्या पायाला त्या बांधण्यात आल्या. सभामंडपाच्या दर्शनी भागाशी एक पाच फुटी बोगदा होता. तिथे गलिव्हर हा दर्शनीय प्राणी पाहण्यासाठी आलेले दरबारी लोक उभे राहत असत. पायांला बांधलेली साखळी दोन यार्ड लांब असल्याने गलिव्हरला तिथल्या तिथे थोडीशी हालचाल करता येत होती. असे हे गलिव्हरचे बंदिस्त जीवन आता सुरू झाले होते.

दुसऱ्या दिवशी राजा मोठ्या इतमामासह आपल्या घोड्यावर स्वार होऊन गलिव्हरला बघण्यासाठी मुद्दाम आला होता. गलिव्हर त्या देवालयाच्या मोकळ्या आवारात मोकळेपणाने हिंडत होता. अर्थात पायात साखळदंडाची भूषणे होतीच. तरीही हा अजस्त्र मानव बघून राजाचा घोडा ताडकन् मागल्या पायांवर उभा राहिला. राजाने त्याला मोठ्या शिताफीने सावरले. आणि मग हे जाणूनच गलिव्हर आपल्या घरात रांगत गेला. राजाने गलिव्हरची उत्तम सरबराई ठेवण्याचा आपल्या सेवकांना हुकूम केला होता. हा पांढरा हत्ती पोसणे त्या छोटेखानी लिलिपुट राज्याला मोठे जड जात होते. पण हौसेला मोल नसते म्हणूनच गलिव्हरचे सर्वतोपरी कोडकौतुक केले जात होते.

राजा दुरूनच गलिव्हरला पाहत होता; तरी सावधगिरीने त्याने आपली चिमुकली तरवार हातात धरली होती. त्याचे आणि त्याच्या भोवतालचे स्त्री-पुरुष रंगीबेरंगी झगमगी पोषाखात नटले होते. भोव-

खाली पसरलेल्या हिरवळीवर तो रंगीबेरंगी वस्त्रप्रावरणात सजलेला छोटा जनसमूह रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्याप्रमाणे दिसत होता. थोडया वेळाने हा समूह निघून गेला.

गलिव्हरच्या आगमनाची बातमी त्या इवल्याशा राज्यात हां हां म्हणता पसरली. मग काय, माणसांच्या झुंडीच्या झुंडी हे अजब आश्चर्य पाहायला येऊ लागल्या. कधी कधी त्यांच्या मर्कटचेष्टांचा गलिव्हरला बराच त्रास होई. मधूनच तो ओरडायचा आणि मग त्या चिमुकल्या माणसांना पळता भुई थोडी व्हायची.

ह्या अजब राक्षसाला पोसण्यामुळे आपल्या राज्यात दुष्काळ पडेल असे काही विचारी अधिकाऱ्यांना वाटले आणि त्यांनी गलिव्हरवर विषारी बाणांचा वर्षाव करून त्याला ठार मारावे, असा सल्ला राजाला दिला. पण एवढया मोठया राक्षसाचे प्रेत राज्यात कुजत पडल्यास राज्यात रोगाच्या साथी सुरू होतील अशीही भीती काहींनी बोलून दाखविली. शिवाय गलिव्हरची वागणूकही व्यवस्थित होती. त्यामुळे राजाने गलिव्हरची सरबराई पूर्वीप्रमाणेच चालू ठेवली. त्याच्या सेवेला सहाशे नोकर ठेवलेले होते. रोज आसपासच्या गावांतून सहा घोडे, चाळीस मेंढया आणि पंचवीस गाड्या भाजीपाला त्याच्यासाठी आणला जात होता.

एकदा राजाच्या आज्ञेवरून गलिव्हरची तपासणी घेण्यात आली. राजाने गलिव्हरला शिकवण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे अधिकाऱ्यांचे हुकूम गलिव्हरला आता कळू लागले होते. त्याचे खिसे तपासण्याची इच्छा अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. तेव्हा गलिव्हरने अलगद दोन अधिकारी उचलले आणि आपल्या खिशात सोडले. त्या खिशात गेलेल्या अधिकाऱ्यांनी बरोबर कागद, पेन्सिल नेली होती. त्यांनी

गलिव्हरच्या खिशातील घडयाळ, काही नाणी, साखळी ह्यांची नोंद केली आणि खिशातून बाहेर आल्यावर ह्या वस्तू राजाला दाखविण्यास गलिव्हरला सांगितले. त्या छोटया अधिकाऱ्यांनी आपल्या संशोधनाचे मोठे सुरेख वर्णन केले होते. राजदरबारात पसरावयाचा गालिचा असे त्यांनी गलिव्हरच्या रुमालाचे वर्णन केले होते. घडयाळाला त्यांनी साखळी बांधलेले एक चांदीचें मोठे इंजिन असे म्हटले होते. त्या इंजिनाचा आवाज पाणचक्कीप्रमाणे होतो, त्यामध्ये कोणी तरी अद्भुत प्राणी असावा किंवा त्या पर्वतमाणसाचा देव असावा, असे त्यांनी लिहिले होते. गलिव्हर एकसारखा घडयाळाकडे पाहत असल्याने त्यांना ते घडयाळ म्हणजे त्याचा देव वाटले.

त्यांचे हे संशोधन-वर्णन त्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी दरबारात वाचून दाखविले. तेव्हा सारा दरबार आश्चर्याने चित्रासारखा तटस्थ झाला होता. वाचन-समाप्तीनंतर राजाने गलिव्हरला त्यांतील काही महत्त्वाच्या आणि त्यांच्या दृष्टीने भयंकर घातक अशा वस्तू दाखविण्यास सांगितले. एक चाकू, छोटीशी सुरी, नाणी ह्या वस्तू गलिव्हर खिशातून बाहेर काढू लागला तेव्हा त्याच्याभोवती हजारो सैनिक धनुष्यबाण, भाले सज्ज करून उभे राहिले होते. गलिव्हरने शांतपणे हसत हसत एक एक वस्तू काढून खाली ठेवली. तेव्हा त्यांची भीती थोडीशी पळाली. त्याच्या हातातली कटयार कोवळ्या सूर्यकिरणांत तळपली. ते पाहूनच काहीजणांची बोबडी वळली. तेव्हा गलिव्हरने मुकाटयाने ती कटयार म्यान केली. त्याने आपले एक पिस्तूल बाहेर काढले आणि हवेत झाडले. तेव्हा ते भोवताली उभे राहिलेले किती तरी सैनिक मेल्याप्रमाणे खाली कोसळले. नंतर त्याचे घडयाळ राजाने मोठ्या कुतूहलाने पाहिले. त्याची एकसारखी चाललेली टिक् टिक् ऐकून तर त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. नंतर पैशाचे पाकीट काढून त्यातील सोन्याची नाणी

गलिव्हरने राजाला दाखविली. नंतर गलिव्हरचा हा सारा खजिना मोठमोठ्या गाड्यांवरून जामदारखान्याकडे नेण्यात आला.

चष्मा, एक छोटीशी दुर्बीण आणि इतर काही उपयुक्त वस्तू त्याच्या खिशात होत्या. पण सुदैवाने त्या काही राजाला दाखविण्याची पाळी गलिव्हरवर आली नाही. ह्याचे गलिव्हरला बरे वाटले. कारण त्या वस्तूंचा त्या छोटेखानी माणसांना तर काही उपयोग नव्हता, पण पुढे-मागे गलिव्हरचे मात्र त्यावाचून फार अडले असते.

त्याच्या शांतपणाच्या वागण्याने गलिव्हर हळूहळू जास्तजास्त राजमान्य आणि लोकमान्य होऊ लागला. ह्या अनुकूल हवेमुळे स्वातंत्र्याची हवा लवकरच आपणास अनुभवावयास मिळेल अशी आशा गलिव्हरच्या मनात डोकावू लागली. आता लोक त्याला भीत नसत. त्याच्या अगदी जवळ येत. मुले तर त्याच्या डोक्यावरील केसांमध्ये लपंडावाचा खेळ खेळत. एखाद्या वेळेस त्यांतले एखादे मूल हळूच आपल्या हातात घेऊन गलिव्हर त्याकडे कौतुकाने पाहत बसे. लहान मूल हातातल्या फुलपाखराकडे कौतुकाने पाहते ना, तसे !

ते लोकसुद्धा त्याला सुंदर सुंदर खेळ करून दाखवीत आणि त्याचे मनरंजन करीत. राजाने मुद्दाम असे करमणुकीचे कार्यक्रम त्याच्यासाठी घडवून आणले. विशेषतः दोरावरचा नाच हे एक त्यांचे वैशिष्ट्यच होते. आपला कपडे शिवण्याचा दोरा असावा ना, इतकाच जाड दोरा तीन-चार फूट उंचीच्या काडीवजा खांबावर ताणून बांधलेला असावयाचा आणि त्यावर कसरतपटू नाच करावयाचा. नाचता नाचता तो उंच उडीही घ्यावयाचा. गंमतीची गोष्ट ही की, मंत्री, सेनापती अशा अधिकाऱ्यांना देखील ही कसरत करून दाखवावी लागे. आणि जितका अधिकारी मोठा तितकी त्याची उडी जास्त उंच आली पाहिजे, असा

दंडक होता. पुष्कळ वेळा अपघात होत आणि अधिकाऱ्यांच्या जागा रिकाम्या होत.

अधिकाऱ्यांना दुसऱ्या एका खेळात आपले कौशल्य दाखवावे लागत असे. तो खेळ म्हणजे काठीवरच्या उड्या. राजा स्वतः काठी हातांत धरीत असे. कधी तो काठी उंच धरी, मग खेळाड काठीखालून सरपटत जाई. कधी काठी खालपट धरली जाई. मग खेळाडू काठीवरून उडी घेई. काठीला स्पर्श न करता जो कोणी हा खेळ कौशल्याने करून दाखवी त्याला तांबड्या-निळ्या फिती दिल्या जात. बहुतेक सर्वच अशा फिती लावलेले दिसत होते.

गलिव्हरने हे जसे त्या लोकांनी करून दाखविलेले करमणुकीचे कार्यक्रम पाहिले त्याप्रमाणे त्याने स्वतः एक नावीन्यपूर्ण खेळ त्या लोकां-कडून करवून घेतला. जंगलातून मोठमोठी झाडे तोडून गाड्यांतून आणण्यात आली. चार चार फूट उंचीचे त्यांचे खांब केले आणि ते त्याने जमिनीत रोवले व त्यावर आपला हातरुमाल ताणून बांधला. नंतर त्याने छोटे घोडेस्वार त्या रुमालावर अलगद ठेवले आणि त्यांना लुटुपुटीची लढाई खेळायला लावले. सर्वांना हा खेळ इतका आवडला, की तीन-चार वेळा हा खेळ करून दाखवावा लागला. मध्येच एका घोड्याचा पाय रुमालात अडकला आणि रुमाल फाटला. घोडेस्वारासहित घोडा खालीच आदळायचा, पण गलिव्हरने झटकन् खाली हात धरला म्हणून अपघात टळला आणि त्या कार्यक्रमाची शोकान्तिका झाली नाही.

एके दिवशी काही घोडेस्वारांनी दरबारात एक खळबळजनक वार्ता सांगितली. सागरकिनाऱ्यावर ज्या ठिकाणी प्रथम गलिव्हर त्यांना सापडला त्या ठिकाणी एक वाटोळी, चपटी, काळी, प्रचंड अशी वस्तू त्यांना आढळली होती. तिच्याभोवती हिंडून त्यांनी अगदी बार-

काईने निरीक्षण केले होते. ‘ महाराजांच्या शयन-मंदिराएवढी ती वस्तू आहे. चार घोडेस्वार एका वेळेस जाऊ शकतील अशी तिची भोवताली चपटी कड आहे आणि मधला मात्र गोल काळा घुमट आहे. कडेच्या एका बाजूला शेसवाशे घोडे सहज बांधता येतील असा एक मोठा दोरखंड आहे. पण ती वस्तू निर्जीव आहे महाराज, कारण तिच्या अगदी जवळून फेऱ्या मारल्या आम्ही. ’ हे त्या घोडेस्वारांनी राजाला सांगितलेले वृत्त गलिव्हरने ऐकले तेव्हाच त्याने ओळखले की, आपल्या डोक्याच्या विरहाने व्याकुळ झालेल्या आपल्या टोपीची ही प्रशस्ती आहे. राजाने ती टोपी आणण्याची घोडेस्वारांना आज्ञा केली. ती ऐकून गलिव्हरला केवढा आनंद झाला ! पण प्रत्यक्ष टोपी जेव्हा आली तेव्हा मात्र तिची दुर्दशा पाहून त्याचा आनंद पार पळाला. त्या घोडेस्वारांनी त्याच्या टोपीला बरीचशी छिद्रे पाडली आणि त्यांतून दोरे ओवून घोड्यांच्या सहाय्याने ती टोपी ओढत आणली. धुळीने पार माखून गेली होती त्याची टोपी.

ती टोपी झटकून गलिव्हरने जेव्हा आपल्या डोक्यावर घालून दाखविली तेव्हा सर्वांना मोठी मौज वाटली. ह्या पर्वतमानवाचे विशालत्व आणि आपले क्षुद्रत्व लक्षात आल्यावर राजाच्या मनात एक वेगळीच कल्पना झळकून गेली. त्याने आपले प्रजाजन, आपले सैनिक एका दृष्टिक्षेपात पाहून घेतले आणि नंतर ताठ उभा राहिलेल्या सहाफुटी गलिव्हरला त्याने आपादमस्तक न्याहाळले. बराच वेळ लागला त्याला हे निरीक्षणकर्म उरकायला. वर मान करून गलिव्हरच्या डोक्याकडे पाहता पाहता तर त्याचे शिरोभूषण खाली पडले. त्याचाच तोल जात होता पण त्याच्याच मागे मंत्री आणि सेनापती उभे होते, त्यांनी त्याला सावरले म्हणून बरे झाले. दोन्ही पाय लांब करून गलिव्हर उभा होता. त्याला तसा उभा असलेला पाहून राजाने टाळी वाजविली आणि सेनापतीला सांगितले.

‘ आपली सारी प्रजा, सगळे सैनिक आणि सर्व अधिकारी ह्यांची माझ्यासहित एक प्रचंड मिरवणूक नगरसीमेपासून निघू द्या. ही सारी मिरवणूक राजवाड्याकडे येईल ती ह्या पर्वतमानवाच्या पायांच्या कमानीतून येईल. एवढी अवाढव्य कमान दरबारी मिरवणुकीला कधी लाभली नसेल. ’

राजाचा हुकूम तो. तोंडातून पुरता बाहेर पडावयाच्या आत त्याची अंमलबजावणी व्हावयाची. ताबडतोब हुकुमावर हुकूम सुटले. सारी माणसे लगबगीने नगरसीमेकडे निघाली. मिरवणुकीची जुळवाजुळव झाली. रणवाद्ये घुमू लागली. मिरवणूक राजवाडयाकडे निघाली. सर्वांत पुढे वादकांचा ताफा चालला होता. नंतर काही अधिकारी, मानकरी चालले होते. त्यांच्या मागोमाग अंबारीचा हत्ती झुलत होता. मागे सैनिक, नगरवासी लोक चालले होते. अंबारीमध्ये बसलेला राजा आपल्या वैभवाच्या दर्शनाने अगदी खूष झाला होता. आणि हे सारे चिमुकले वैभव गलिव्हरच्या पायांखालून जाऊ लागले. तेव्हा त्या चिमुकल्या राजाचा आनंद गगनात सुद्धा मावेना. हे सारे गमतीचे दृश्य गलिव्हर मोठ्या कौतुकाने पाहत होता. वारुळाकडे जाणारी मुंग्यांची रांग एखाद्या बालकाने कुतूहलाने पाहावी त्याप्रमाणे.

सारी मिरवणूक राजवाडयापाशी थांबली. सर्व लोक राजाच्या हत्तीच्या दोन्ही बाजूंना उभे राहिले. संतुष्ट झालेला राजा अंबारीतच उभा राहून गलिव्हरकडे पाहत शक्य तितक्या मोठ्या आवाजात म्हणाला, ‘ पर्वतमानवा, आम्ही तुझ्यावर खूष आहोत. ह्या प्रसंगी तुला काही बक्षीस मागावयाचे असल्यास खुशाल माग. ’

गलिव्हरने हसून खाली वाकून हळूच राजाला हातात घेऊन शक्य तितक्या हळू आवाजात त्याला म्हटले, ‘ माझी सुटका करावी महाराज. मला स्वातंत्र्य मिळावे. ’

गलिव्हरने पुन्हा त्याला अंबारीत ठेवल्यावर राजा म्हणाला, ' दरबारात ह्याचा विचार होईल. '

गलिव्हरच्या चांगल्या वर्तनाने सर्व दरबारी लोक भारलेले असल्यामुळे त्याला स्वतंत्रता देण्याच्या आड फारसे कोणी आले नाही. अर्थात काही अटींवर त्याला हे स्वातंत्र्य देण्यात आले. त्या अटी पुढीलप्रमाणे :

आमची राजमुद्रा असलेल्या आमच्या लेखी आज्ञेखेरीज पर्वतमानवाने राज्याची सरहद्द सोडू नये.

आमच्या अनुज्ञेखेरीज त्याने राज्यात इतरत्र हिंडू नये. लोकांना दोन तास अगोदर सूचना दिली म्हणजे ते आपआपल्या घरात सुरक्षित बसतील. शेतातून किंवा कुरणातून न चालता त्याने प्रशस्त अशा राजमार्गानच चालावे. तसेच रस्त्याने चालताना पायाखाली कोणी प्रजाजन सापडणार नाही अशी दक्षता त्याने घ्यावी.

पर्वतमानवाने आपल्या प्रचंड सामर्थ्याचा आमच्या राष्ट्रातील श्रमाची कामे करण्यास उपयोग करावा. शेवटी विशेष म्हणजे आमच्या विरुद्ध त्याची आम्हांला मदत झाली पाहिजे.

त्या लोकांच्या पद्धतीप्रमाणे डाव्या हाताने उजव्या पायाचा अंगठा धरून आणि उजवा हात डोक्यावर ठेवून गलिव्हरने वरील सर्व अटी पाळण्याची शपथ घेतली.

नंतर विशेष समारंभाने गलिव्हरच्या हातापायातील बेड्या काढण्यात आल्या आणि लिलिपुटचा सन्मान्य नागरिक म्हणून राजाने त्याचा बहुमान केला. त्याप्रमाणेच त्याची योग्य व्यवस्था ठेवण्याची राजाने अधिकाऱ्यांना आज्ञा केली, आणि एक उपयुक्त प्रजाजन ठरण्याचा गलिव्हरने प्रयत्न करावा, अशी इच्छा त्याने बोलून दाखविली.

राजधानीचे शहर पाहण्याची इच्छा गलिव्हरने व्यक्त केली तेव्हा प्रथम दवंडी पिटून सर्व लोकांना आपल्या घरात जाण्यास सांगण्यात आले

आणि मग गलिव्हरला परवानगी देण्यात आली. दिवाळीत मांडलेल्या किल्ल्याप्रमाणे टुमदार दिसणारी ती लिलिपुटची राजधानी गलिव्हरने मोठ्या कौतुकाने पाहिली. पाच फूट रुंदीच्या राजमार्गावरून तो जात असताना दारे, खिडक्या, सज्जे, गच्च्या या ठिकाणी गर्दी करून उभे असलेले स्त्री-पुरुषही त्याला तितक्याच कौतुकाने पाहत होते. कुंड्यांमध्ये रंगीबेरंगी फुलांची जशी दाटी व्हावी त्याप्रमाणे त्या छोटया छोट्या घरकुलांमध्ये रंगीबेरंगी पोषाख केलेल्या माणसांनी केलेली दाटी त्याला वाटत होती. मधून मधून येणाऱ्या बागांची कुंपणे तो सहज पाय पलीकडे टाकून ओलांडून जात असे, तेव्हा त्या लिलिपुटच्या स्त्रिया आश्चर्याने किंचाळत. ती सारंगीची लकेर मानीत गलिव्हर हसत असे. सर्व शहर पाहता पाहता त्याने राजप्रासादही पाहून घेतला. राजाने आणि राणीने त्याचे स्वागत केले. खाली गुडघ्यावर बसून त्याने त्या स्वागताचा स्वीकार केला.

ह्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंधरा दिवसांनी राजाचा एक प्रमुख चिटणीस गलिव्हरला मुद्दाम भेटण्यासाठी आला. गलिव्हरने संभाषण होईपर्यंत त्याला अलगद आपल्या हातात धरले होते. राज्यावर परचक्र येण्याचा संभव आहे, असे त्या चिटणिसाने आपल्या भाषणात सांगितले. राज्यात दोन गट होते. त्यांच्यातील भांडणे इतकी विकोपास गेली होती की, ते एकमेकास कधी भेटले तर बोलत तर नसतच, पण तोंडे फिरवून विरुद्ध दिशेला चालू लागत. अशी ही राज्याची अंतर्गत स्थिती स्फोटक असतानाच ब्लेफ्स्कू बेटाच्या सम्राटाने आक्रमण करण्याची भाषा सुरू केली होती. ही हकीकत गलिव्हरला सांगून तो चिटणीस म्हणाला, " आमच्यासारखी इतर अनेक राष्ट्रे ह्या पृथ्वीवर आहेत आणि ती एकमेकांचा नाश करायला नेहमी टपलेली असतात. तुझ्याएवढया माणसांचे देश मात्र कुठे असतील असे आमच्या

शास्त्रज्ञांना वाटत नाही. त्यांच्या मताने तू आकाशातूनच पडला असावास. तुझ्यासारखी दहावीस माणसे ह्या साऱ्या जगाचा खात्रीने नाश करतील. शिवाय जगाच्या पाठीवर लिलिपुट आणि ब्लेफूस्कू या दोन राष्ट्रांइतकी महान् राष्ट्रे असल्याचे जगाच्या इतिहासाला माहीतच नाही. ह्या दोन राष्ट्रांचे वैर आणि त्यांच्यातील युद्धे यांनीच सारा इतिहास रंगला आहे. सध्याच्या आमच्या महाराजांच्या आजोबांनी रुंद बाजूने अंडे फोडताना आपले बोट कापून घेतले तेव्हा तेव्हाच्या महाराजांनी 'अरुंद बाजूने अंडे फोडावे' असा एक वटहुकूम काढला होता. तेव्हा लोकांची बंडखोर वृत्ती जागी झाली. त्यांना ब्लेफूस्कूच्या राजसत्तेने चिथावणी दिली आणि तेव्हापासून हा वैराग्नी धुमसत आहे. आता तर त्यांनी मोठे आरमार जमविले आहे आणि आमच्या लिलिपुटवर मोठी स्वारी करण्याची तयारी चालविली आहे. अशा बातम्यांवर बातम्या येत आहेत...... तेव्हा महाराजांची अशी इच्छा आहे की, पर्वतमानवाच्या साहाय्याने हे ब्लेफूस्कू प्रकरण कायमचे मिटवून टाकावे.'

'मला महाराजांची आज्ञा मान्य आहे.' हे गलिव्हरचे शब्द ऐकताच त्या चिटणिसाने गलिव्हरच्या हातावरून टुणकन् उडी मारली आणि तो धावतच ही आनंदाची वार्ता राजाला सांगायला गेला.

लिलिपुटच्या आग्नेय दिशेला ब्लेफूस्कू हे बेट होते. साधारण सात-आठशे यार्ड रुंदीच्या खाडीने हे बेट लिलिपुटपासून वेगळे केलेले होते. आणि याच भागात ब्लेफूस्कू बेटाचे आरमार लिलिपुटवर स्वारी करण्याच्या तयारीत उभे होते. गुप्तचरांनी ही सारी वित्तंबातमी गलिव्हरला पुरवली होती. शिवाय गलिव्हरनेही जरा दुरून आपल्या दुर्बिणीच्या सहाय्याने ह्या शत्रूच्या आरमाराचे विहंगमदर्शन घेतले होते. ही सारी जहाजे ओढून किनाऱ्याकडे आणण्याची आपली कल्पना गलिव्हरने राजाला सांगितली आणि त्यासाठी काही लोखंडी गज आणि तारा त्याने

पुरवठा-मंत्र्याकडून मागून घेतल्या. तीन तीन गज एकमेकांस गुंडाळून आणि टोकांना वळवून गलिव्हरने पन्नास-साठ हूक तयार केले आणि त्या हुकांना तारा गुंडाळल्या; आणि ही सारी जय्यत तयारी करून, कपडे काढून गलिव्हरने पाण्यात पाऊल टाकले. प्रथम थोडेसे त्याला चालावे लागले. नंतर पाण्याची खोली वाढल्यासारखी वाटताच त्याने जो सूर मारला तो त्याने एकदम शत्रूच्या आरमारी जहाजापाशी आपले डोके वर काढले.

एखाद्या प्रचंड देवमाशाप्रमाणे भासणारे हे प्रचंड धूड पाहताच ती ब्लेफूस्कू मंडळी पार गोंधळून गेली. त्या छोटेखानी सैनिकांनी तर


2832

पटापट पाण्यातच उड्या घेतल्या. जवळ जवळ तीस हजार सैनिकांनी जीव मुठीत घेऊन पोहत जाऊन किनारा गाठला आणि किनाऱ्यावर पोहोचताच गलिव्हरवर त्यांनी बाणांचा वर्षाव सुरू केला. अंगावर, तोंडावर अक्षरशः हजारो टाचण्या टोचत होत्या. ऐन वेळेला आठवण होऊन गलिव्हरने आपल्या डोळ्यांवर चष्मा चढविला म्हणून डोळे वाचले. हे सारे सहन करून त्याने आपल्याजवळील हूक साऱ्या जहाजांना अडकवले आणि त्यांना बांधलेल्या तारा आपल्या हातात घेऊन तो सारा जहाजांचा तांडा ओढत नेण्यास गलिव्हरने सुरवात केली. प्रथम एकही जहाज हालण्याचे नाव घेईना. कारण सारी जहाजे नांगरली होती. मग नांगराच्या तारा तोडून गलिव्हरने जहाजे ओढण्यास सुरवात केली आणि अगदी सहजतेने पन्नास जहाजांचा तो काफिला गलिव्हरने आपल्याबरोबर किनाऱ्याकडे खेचला. त्या जहाजांबरोबर त्यांचे काही सैनिकही खेचले गेले.

शत्रूच्या आरमारासहित गलिव्हरने लिलिपुटच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवताच लिलिपुटच्या असंख्य लोकांनी त्याचा जयजयकार केला. त्याच्या ह्या विजयाची बातमी अगोदरच राजधानीत पोचली होती. आणि म्हणूनच प्रजेसहित राजा गलिव्हरच्या स्वागतासाठी किनाऱ्यावर तावडतोब हजर झाला होता. राजाने मनापासून गलिव्हरचा गौरव केला आणि गलिव्हरने पुन्हा एकदा प्रयत्न करून ब्लेफुस्कूचे सर्व आरमारी सामर्थ्य नष्ट करून ते बेट आपल्या राज्याला जोडावे अशी इच्छा राजाने व्यक्त केली. पण दुसऱ्याचे स्वातंत्र्य नष्ट करण्यासाठी आपले सामर्थ्य नाही असे त्याने स्पष्ट सांगितले. इतर दरबारी लोकांचाही तोच विचार पडला आणि म्हणून राजाचा विचार मागे पडला. विचार मागे पडला तरी गलिव्हरची ही स्पष्टोक्ती राजाला आवडली नाही. स्वार्थान्धाला दुसऱ्याचे उपकार कधी कधी दिसेनासे

होतात. त्यांचा स्वार्थ बुडाला म्हणजे त्याबरोबर कृतज्ञताबुद्धीही त्यांना सोडून जाते. गलिव्हरचे काही हितशत्रूही राजाच्या कानाशी लागले. हलक्या कानाशी कर्णपिशाच्चांचा खेळ सुरू झाला की कारस्थानांचे एकाचढ एक डाव टाकले जातात.

ब्लेफूस्कूच्या महाराजांच्या वतीने तहाचे बोलणे करण्यासाठी आलेल्या वकिलांनी आपली शरणचिठ्ठी लिलिपुटच्या राजाच्या चरणी सादर केली. त्यांच्या कानावर गलिव्हरचा पराक्रम गेला होता. त्यांनी तहाची बोलणी संपल्यावर गलिव्हरची गाठ घेतली आणि त्याला आपल्या राज्यात येण्याचे आमंत्रण दिले. लिलिपुटच्या दरबारनेही गलिव्हरला त्याच्या पराक्रमासाठी ' लिलिपुटभूषण ' हा मोठा मानाचा किताब दिला होता. पण त्यात औपचारिकतेचाच भाग जास्त होता. एकंदर वातावरण गढुळले होते. चहाड्याचुगल्या करणारे लोक राजाचे मन कलुषित करण्यात पूर्णतया यशस्वी झाले नव्हते. कारण राजा जाणत होता, की अशी काही विघ्नसंतोषी माणसे आसपास असावयाचीच; आणि म्हणून तो काही गलिव्हरचे उपकार विसरू शकत नव्हता आणि गलिव्हरही त्याच्या उपकाराची जाणीव मनात ठेवून होता.

हेच सारे विचार सोबतीला घेऊन तो आपल्या निवासस्थानी सुखाने पहुडला असता मध्यरात्री मोठा गोंगाट झाला आणि त्याने त्याची झोप पार पळवून लावली. हजारो लोक ' आग ' ' आग ' असा आरडा-ओरडा करीत त्याच्या निवासस्थानापाशी गोळा झाले होते. त्या गर्दीतून वाट काढीत अधिकारी पुढे आले आणि त्यांनी गलिव्हरला राजवाड्याकडे चलण्यास सांगितले. सारे लोक प्राणभयाने भराभरा बाजूला झाले आणि त्यांनी गलिव्हरला वाट करून दिली. एकाही माणसाला आपल्या पाया-खाली न चिरडता गलिव्हर झपाझप पावले टाकीत राजवाडयापाशी येऊन पोहोचला. राणीच्या महालाने चहूकडून पेट घेतला होता. राणीची दासी

रात्री काही साहसी कथा वाचीत होती. वाचता वाचता ती झोपी गेली होती; पण दिवा मात्र तसाच ढणढणत होता. वाऱ्याने तो भडकला आणि त्याने राणीचा महाल पेटवला. त्या लोकांनी छोट्या शिडया लावल्या होत्या महालाला. छोट्या छोट्या बादल्या पाण्याने भरून ठेवल्या होत्या त्यांनी. छोटया म्हणजे इतक्या, की लहानसा चमचाभर पाणी त्यात कसेबसे बसले असते. गलिव्हरने ताबडतोब त्या बादल्यांतील पाणी पेटलेल्या महालावर शिंपडले. त्याला भराभर पाणी आणून देताना त्या माणसांचा अगदी गोंधळ होत होता. पाण्याचा साठा हा जरा दूर होता. ते पाणी आणताना धडपडत, पडत. आणि त्यांनी इतक्या श्रमाने आणलेले पाणी गलिव्हर क्षणार्धात संपवून टाकीत असे. तरी अग्निदेव शांत होण्याचे लक्षण दिसेना. शेवटी गलिव्हरला युक्ती सुचली. त्याने स्वतः त्या तळ्यातील पाणी तोंड भरून घेतले आणि महालापाशी येऊन जोराने चूळ महालावर टाकली. असे तीन चार वेळा करताच अग्नी अगदी गार झाला आणि राणीचा महाल सुरक्षित राहिला.

ह्या छोटया माणसांच्या देशात गलिव्हरला बऱ्याच गोष्टी जशा चमत्कारिक तशा उद्बोधकही आढळून आल्या. चोरीपेक्षाही लाच-लुचपतीचा गुन्हा त्या राज्यात भयंकर समजला जात असे, आणि गुन्हेगाराला कडक शासन केले जात असे. मेलेल्या माणसाला ते खाली डोके वर पाय अशा अवस्थेत पुरत असत. ह्या कल्पनेमागची त्यांची समजूत अशी होती की, कालांतराने ह्या पृथ्वीची स्थिती बदलेल आणि जेव्हा ह्या माणसांना नवा जन्म मिळेल तेव्हा ती आपल्या पायावर उभी राहू शकतील. कृतघ्न माणसे त्या राज्यात भयंकर समजली जात असत. सहकार्याने एकत्र राहणारा मानवसमूह म्हणजे समाज. ह्या समाजाच्या स्वरूपाला कृतघ्न माणसाच्या वागण्याने तडा जातो. तो स्वतः दुसऱ्याच्या उपयोगी पडत नाही आणि आपल्या ह्या वागण्याने दुसऱ्याच्याही मनात

ही वृत्ती तो निर्माण करतो. ह्यासाठी कृतघ्न माणसाला त्या राज्यात कडक शासन केले जात असे.

काही विद्वान् लहान मुलांसाठी शाळा चालवीत. त्या शाळांमध्ये मुलांच्यामध्ये विनय, न्यायप्रियता, प्रामाणिकपणा, धर्मप्रीती असे गुण वाढीस लावण्याचे प्रयत्न केले जात. काही मोठी माणसे लहान मुलांना भुताखेतांच्या, पऱ्यांच्या गोष्टी सांगून त्यांच्या मनात भीती, स्वप्नाळूपणा ह्या भावना वाढीस लावतात. असे करणे ह्या देशात गुन्हा समजला जात असे. भावी पिढी उत्तम तयार करण्याच्या दृष्टीने मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविले जात असे.

गलिव्हरने आपल्या सोयीसाठी अनेक गोष्टी करून घेतल्या होत्या. शेकडो झाडे तोडून आणून त्याने स्वतःसाठी टेबल आणि खुर्ची तयार करून घेतली होती. तीनशे शिंपी गलिव्हरचे कपडे शिवण्यासाठी झटत होते. त्याचे कोटाचे, सदऱ्याचे माप त्यांना घ्यावयाचे होते. तेव्हा तो जमिनीवर निजला. एकजण त्याच्या डोक्याशी उभा राहिला आणि एक-जण पायाशी उभा राहिला. दोघांनी गलिव्हरच्या डोक्यापासून पायापर्यंत एक दोरी ताणून धरली आणि तिसऱ्याने इंचपट्टीने दोरी मोजली. एकदा गलिव्हर गुडघ्यावर बसला. शिड्या लावून एकदोघे त्याच्या खांद्यावर चढले. तेथून त्यांनी दोरी सोडली. जमिनीला दोरीचे टोक टेकल्यानंतर ती दोरी त्यांनी मोजली आणि गलिव्हरच्या कोटाच्या उंचीचे माप मिळविले. अशा रीतीने मापे मिळवून, एक इंच पन्ह्याचे आणि एक फूट लांबीचे पुष्कळ कापडाचे तागे एकत्र करून त्या लोकांनी ह्या पर्वतमानवाला नटविण्यासाठी प्रचंड कारखाना उभारला तेव्हा त्याला अंगभर कपडा मिळाला. त्याच्या जेवणाची व्यवस्थाही अशीच अजस्र होती. तीनशे आचारी खपत असत ह्या बकासुराची त्राराची वेळ भागवायला. त्या छोट्या माणसांपैकी पंचवीस-तीस माणसांचे एका

वेळचे जेवण म्हणजे गलिव्हरचा एक घास होत असे. त्याच्या पंक्तीला एकदा कौतुकाने आलेली दरबारी माणसे त्याच्याकडे 'आ' करून पाहत बसली. त्यांना तो 'आ' तसाच ठेवावा लागला. कारण त्यांच्या पुढच्या पाची पक्वान्नांना गलिव्हरच्या पोटात केव्हाच उदार आश्रय मिळाला होता. ह्या साऱ्या वस्तुस्थितीचा परिणाम लिलिपुट राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला होता. दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची लक्षणे दिसू लागली. तिजोऱ्या रिकाम्या पडू लागल्या. दरबारी लोकांनी चिंताग्रस्त मुद्रेने हे देशावरचे राक्षसी गंडांतर काही तरी मार्गांनी दूर करण्याविषयी राजाला सांगितले. राजालाही ते पटू लागले. कारण कौतुकाचे आणि आश्चर्याचे वारे आता थांबले होते आणि जीवनमरणाचा प्रश्न सगळ्या राष्ट्रापुढे आता उभा राहिला होता. ह्यातच काही कारस्थानी संकुचित मनाच्या लोकांनी राजाचे मन बिघडविण्याचे पुण्यकर्म केले.

पुष्कळ वेळा राणी आपल्या दासीसह गलिव्हरच्या भेटीला येत असे. गलिव्हरच्या पराक्रमाला तिच्या अंतःकरणात आदराचे स्थान प्राप्त झाले होते. पुरुषाचा पराक्रम स्त्रीला पूजनीय वाटतोच. सहा पांढरे शुभ्र घोडे जोडलेल्या सुंदर सुवर्णरथात बसून राणी गलिव्हरकडे येत असे. गलिव्हर हसतमुखाने तिचे स्वागत करी. ती येताच तिचा रथ तो हळूच उचलून आपल्या टेबलावर ठेवी आणि आपली हनुवटी टेबलाला टेकवून तिच्याशी गप्पागोष्टी करी. सुखसंवाद संपला की पुन्हा रथ खाली उचलून ठेवी. रथ आपल्या गतीने जात असे आणि गलिव्हरही आपल्या नित्यकर्मांकडे वळत असे. राणीच्या ह्या गलिव्हर भेटीला खलवृत्तीच्या माणसांनी विकृत स्वरूप दिले. अनेक कारणांनी गलिव्हरविषयी मत्सराने पुष्कळ माणसे जळफळत होतीच. त्यांनी आता कारस्थानांची पूर्तता करून गलिव्हरला राजकीय गुन्हेगार ठरविले.

एके दिवशी एक छोटासा सरदार गलिव्हरच्या निवासस्थानाकडे आला आणि गलिव्हरच्या निवासस्थानावरील पहारेकऱ्यांना सांगू लागला,

'मला पर्वतमानवाशी काही बोलावयाचे आहे.' पहारेकरी त्याला आत सोडीनात. तो सरदार तिथेच एका खुर्चीवर बसून राहिला. गलिव्हरच्या कानांवर ही गडबड गेली तेव्हा बाहेर येऊन त्याने चौकशी केली. नंतर त्या सरदाराला त्याने खुर्चीसकट आपल्या खिशात बसविले आणि तो आत गेला. आत गेल्यावर खोलीचे दार त्याने आतून लावून घेतले आणि आपल्या खुर्चीवर बसल्यावर त्याने त्या सरदाराला खिशातून काढून टेबलावर ठेवले. गलिव्हरच्या विरुद्ध जळफळणाऱ्या लोकांनी प्रथमपासून गलिव्हरच्या विरुद्ध कोणकोणती कारस्थाने रचली ते सारे महाभारत त्याने गलिव्हरला ऐकवले.

ब्लेफुस्कूविरुद्ध गलिव्हरने जो अभूतपूर्व पराक्रम केला होता तो पाहून सेनापती बोलगोलाम त्याचा कट्टा दुष्मन झाला होता. त्याने इतर अधिकाऱ्यांशी संगनमत करून गलिव्हरविरुद्ध आरोपांची यादीच तयार केली होती. तोंडातल्या पाण्याची चूळ राणीच्या महालावर टाकून गलिव्हरने आग विझवली होती. हा शाही वास्तूचा महान् अपमान होता. ब्लेफुस्कूचे आरमार लिलिपुटच्या किनाऱ्यावर ओढून आणल्यानंतर ब्लेफुस्कूची सर्वच जहाजे नष्ट करण्याचा हुकूम राजाने दिला असता गलिव्हरने तो मानला नाही. हा भयंकर राजद्रोह होता. ब्लेफुस्कू राज्याचे वकील तहाची बोलणी करायला आले असता त्या पराभूत शत्रूची खुशामत करण्याचा अक्षम्य गुन्हा गलिव्हरने केला होता. ह्या वकिलांच्या तर्फे त्या राजाने दिलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करून ब्लेफुस्कू बेटाला भेट देण्याचा मनसुबाही गलिव्हरने केला होता. लिलिपुटच्या महाराजांनी ह्या त्याच्या बेताला केवळ शाब्दिक संमती दिली होती. पण तेवढ्याच काडीचा आधार घेऊन

गलिव्हर लिलिपुटच्या शत्रुराष्ट्राला भेट देण्याची तयारी करू लागला होता. अशा नानाविध आरोपांची मालिका गलिव्हरच्या विरुद्ध तयार करण्यात आली होती. सेनापती बोलगोलाम आणि त्याचे कारस्थानी सहकारी यांनी राजाच्या अनेक भेटीगाठी घेतल्या. गुप्त खलबते झाली होती. प्रकरण बरेच शिजत आले होते आणि राजाने काही निर्णयही घेतला होता. ही सारी गुप्त हकीकत त्या छोटया सरदाराने गलिव्हरला सांगितली आणि गलिव्हरला कोणती शिक्षा करावी ह्याविषयी कोणी कोणती मते व्यक्त केली हे सांगताना गलिव्हरला कान खाली करायला सांगून तो सरदार म्हणाला,

'अनेकांनी अनेक शिक्षा सुचविल्या. महाराजांचा दृष्टिकोण मात्र उदात्तच होता. तुझ्या घराला मध्यरात्री आग लावून तुला जिवंत जाळण्याची शिक्षा द्यावी असे खजिनदारांनी आणि आरमारी अधिकाऱ्यांनी सुचविले; आणि सेनापतीसाहेबांनी तर वीस हजार स्वारांनिशी तुझ्यावर विषारी बाणांचा वर्षाव करण्याचे ठरविले आहे. तुझ्या नोकरांना तुझ्या कपड्यांवर भयंकर जालिम विष शिंपडायला सांगावे म्हणजे ते कपडे अंगावर चढवले की त्या विषाचा दाह असह्य होऊन तू स्वतःच तुझ्या अंगाचे लचके तोडशील आणि मृत्युमुखी पडशील अशी क्रूर कल्पना एकाच्या डोक्यातून निघाली. महाराजांनी मात्र ह्या कल्पना स्वीकारल्या नाहीत. तुझे प्राण वाचावेत अशीच त्यांची इच्छा असावी. त्याने आपल्या खासगी चिटणिसाला त्याचे मत विचारले. तुझ्याविषयी ह्या चिटणिसाच्या मनात नेहमीच दयाभाव वसत असल्याने त्याने तुझे प्राण वाचवावेत, पण तुझ्या गुन्ह्याबद्दल शिक्षा म्हणून तुझे डोळे काढावेत असा सल्ला राजाला दिला. तुझ्या सामर्थ्याचा उपयोग तर करून घ्यायचा पण तो मंत्र्याच्या दृष्टीने करून घ्यावयाचा हा हेतू साधण्यासाठी चिटणिसाने मोठा कल्पक मार्ग सुचविला आहे. पण सूडबुद्धीने पेटलेल्या इतर दरबारी

लोकांना ही सूचना मुळीच पटली नाही. तुला ते राजद्रोही समजतात. तुझ्यासारख्या राजद्रोह्याचे प्राण वाचविण्याची शिफारस चिटणिसाने करावी याविषयी आश्चर्य व्यक्त करून सेनापतीने पुन्हा एकदा तुला मृत्यूचीच शिक्षा दिली पाहिजे असे आवर्जून सांगितले. खजीनदाराचेही तेच मत पडले.

महाराजांना मात्र, तुला देहान्त शासन द्यावे असे मुळीच वाटले नाही. मात्र, उघड दरबारी लोकांच्या विरुद्धही त्यांना बोलता येत नव्हते. त्यांच्या समाधानासाठी तुला उपासमारीची शिक्षा द्यावी असे महाराजांनी आपले मत दिले. खजीनदारच सारी तुझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था करतात. तेव्हा त्यांनीच ही शिक्षा अंमलात आणावी असे महाराजांनी सांगितले. हा सारा प्रकार अगदी गुप्त ठेवण्यात येणार आहे. उपासमारीने येणारा मृत्यू ही हळूहळू भोगावी लागणारी शिक्षा आहे. मात्र, डोळे काढण्याची शिक्षा दप्तरी दाखल झाली आहे. ती तातडतोब अंमलात यावयाची आहे. तुझे डोळे काढण्याचे हे शल्यकर्म करण्यासाठी वीस राजवैद्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तू जमिनीवर निजला असताना तुझ्या डोळ्यांतील बुबुळावर टोकदार बाण मारायचे आणि दृष्टी फोडून टाकावयाची अशी ही योजना आहे.

बोलून दम लागल्याने तो छोटा सरदार बोलता बोलता थोडा थांबला आणि पुन्हा घाईघाईने म्हणाला, ' बघ बाबा, मी सारा प्रकार तुझ्या कानांवर घातला आहे. आता तुला तुझी बुद्धी जो मार्ग दाखवील त्या मार्गाने जा. मला मात्र कुणी पाहण्याच्या आत गुप्तमार्गाने गेले पाहिजे. '

गलिव्हरने पुन्हा हळूच त्या सरदाराला आपल्या खिशात ठेवले. दार उघडून तो बाहेर आला. घराच्या मागल्या अंगाला जाऊन, कोणी

नाही असे पाहून त्याने त्या सरदाराला हलकेच रस्त्यावर सोडून दिले. खात्रीप्रमाणे झटकन तो सरदार लगेच पलीकडच्या वळणामागे दिसेनासा झाला, आणि गलिव्हरही काही सुचेनासे होऊन आपल्या घरात आला. काही हितशत्रूंच्या कारस्थानामुळे आपल्यावर ही शिक्षा लादली गेली, ह्याचे गलिव्हरला मोठे वैषम्य वाटले. एकदम ठार मारण्याऐवजी उपासमारीने ठार मारावे आणि डोळे काढावेत ह्या राजाने केलेल्या शिक्षादुरुस्तीत त्याला कुठे दयाभाव आढळेना. उलट आंधळेपणाने झिजत मरण्यापेक्षा तडकाफडकी मरण येणेच अधिक चांगले, असे त्याच्या वैतागलेल्या मनाला वाटू लागले. दगडांचा मारा करून ही सारी राजधानी उद्ध्वस्त करून टाकावी, असेही त्याच्या रागावलेल्या मनाला वाटू लागले. पण राजाने आपल्याला दिलेले स्वातंत्र्य आणि राजाशी एकनिष्ठ राहण्याची आपण घेतलेली शपथ ह्या गोष्टी त्याला आठवल्या आणि आततायीपणाने वागण्याचा विचार बाजूला झाला.

ब्लेफ्स्कूच्या राजाच्या आमंत्रणाप्रमाणे ब्लेफ्स्कू बेटाला जाण्यासाठी राजाने गलिव्हरला जी तोंडी परवानगी दिली होती तिच्या आधारावर गलिव्हरने तावडतोब ब्लेफ्स्कू बेटावर जावयाचे ठरविले. चिटणिसाला तसे कळवून तो तावडतोब किनाऱ्यावर गेला. ब्लेफ्स्कूचे आरमार तिथे उभेच होते. त्यातल्या एका मोठया माणसाला गलिव्हरने पकडले आणि मार्गदर्शकाचे काम करण्याची त्याला आज्ञा केली. त्याने आपले कपडे त्या सगळ्या एकत्र केलेल्या जहाजावर टाकले. नाखव्यांना जहाजे ब्लेफ्स्कू बेटाकडे नेण्यास त्याने सांगितले आणि त्यांच्यामागोमाग प्रथम पाण्यातून चालत आणि नंतर थोडेसे पोहत तो निघाला. दोनशे यार्डांची खाडी ओलांडायला विशेष काय वेळ लागणार? तो तावडतोब ब्लेफ्स्कूच्या प्रमुख बंदरात आला. जहाजावरच्या लोकांनी धावत जाऊन गलिव्हरच्या आगमनाची वार्ता राजाला कळविली. ब्लेफ्स्कूचा राजा,

राणी व इतर दरबारी ताबडतोब गलिव्हरच्या स्वागतासाठी किनाऱ्यावर आले. ब्लेफूस्कूच्या किनाऱ्यावर गलिव्हरचे शाही स्वागत झाले.

ब्लेफूस्कू बेटावरील दोनतीन दिवसांच्या वास्तव्यानंतर गलिव्हर सहज किनाऱ्यावर फिरत असताना पश्चिम समुद्रामध्ये, किनाऱ्यापासून साधारण एक-दोन मैलांच्या अंतरावर लाटांवर एक जहाज हिंदकळत असलेले त्याला दिसले. लाटांच्या जोराप्रमाणे ते जहाज मागेपुढे होत होते. आपल्या देशाची काही तरी खूण इतक्या दिवसांनी दिसल्यामुळे गलिव्हरला अतिशय आनंद झाला. त्या आनंदाच्या भरात त्याने तशीच पाण्यात उडी घेतली. मोठ्या प्रयासाने पोहत पोहत तो त्या जहाजापाशी गेला. वादळाचा जबरदस्त तडाखा बसून विकलांग झालेले ते एक मोठे जहाज होते. वाऱ्याचा जोर किनाऱ्याकडे असल्याने ते लाटांनी हळूहळू किनाऱ्याकडे फेकले जात होते. मागे ओढले जात नव्हते. गलिव्हर तसाच मागे परतला.

राजवाडयात जाऊन गलिव्हरने मदतीची याचना केली. शे-दोनशे छोट्या नावा, तितकेच खलाशी आणि काही दोर बरोबर घेऊन पुन्हा गलिव्हर समुद्राकडे गेला. त्या अवाढव्य जहाजाच्या मानाने ही सारी साधने फारच दुबळी होती. ते बरोबर घेतलेले शेकडो दोर एकत्र वळून गलिव्हरने एक जाड दोरखंड तयार केले आणि ते पाठीवर टाकून तो पोहत त्या समुद्रातील जहाजाकडे निघाला. त्याच्या मागोमाग ती ब्लेफूस्कूची छोटी जहाजे निघाली. ते जहाज वाऱ्याने आणखी जरा किनाऱ्याकडे ढकलले होते. गलिव्हरचे तेवढेच श्रम वाचले होते. जहाजापाशी आल्यावर त्याने आपल्या जवळच्या दोराचे एक टोक जहाजाच्या पुढच्या टोकाला बांधले आणि एक टोक आपल्या कंबरेला बांधले. त्या छोट्या खलाशांनीही आपल्या जवळचे दोर जहाजाला बांधले. परत हा सगळा तांडा किनाऱ्याकडे निघाला. गलिव्हर पोहत किनाऱ्याकडे

चालला होता. ती छोटी जहाजेही किनाऱ्याकडे जात होती. सगळ्यांचा जोर एकवटल्याने ते जहाज हळूहळू किनाऱ्याकडे ओढले जात होते. तशात वाऱ्याची आणि भरतीच्या लाटेची मदत मिळाली. त्यामुळे जहाज किनाऱ्यावर आणण्यात गलिव्हरला यश मिळाले. किनाऱ्यावर केवढी गर्दी झाली हे राक्षसी जहाज पाहायला. सारे दरबारी लोक आले होते.

त्या लोकांमध्ये एकदोन लिलिपुटचेही दरबारी लोक उभे असलेले पाहून गलिव्हर दचकला. तो लिलिपुटहून पळून आला होता. कदाचित हे लोक आपल्याला पकडायला आले असतील, असे त्याला वाटले. आणि खरे तसेच होते. ‘ गलिव्हरला हातपाय बांधून लिलिपुटला पाठवून द्यावे. तो आमचा कैदी आहे. ’ असा राजाचा खलिता घेऊन लिलिपुटचे सरदार ब्लेफूस्कूच्या राजाकडे आले होते. हे जहाज सापडल्यामुळे कदाचित आपल्याला आपल्या देशात परतता येईल हे रम्य स्वप्न तो पाहत होता तोच हे संकट आले होते. तो विवंचनेत पडला. इतक्यात ब्लेफूस्कूचा राजा आपल्या प्रधानासह तिथे आला. त्या सरदारांना उद्देशून तो म्हणाला, “ लिलिपुटच्या महाराजांना सांगा, तुमची विनंती आम्हांला मान्य करता येत नाही. ह्या पर्वतमानवाचे आमच्यावर फार उपकार आहेत. आम्ही कृतघ्न होऊ शकत नाही. ” प्रधानाने त्या सरदारांना राजाचा खलिता दिला. तो घेऊन ते लिलिपुटचे सरदार निघून गेले.

ब्लेफूस्कूच्या राजाने गलिव्हरला आपल्या राज्यात राहण्याचा आग्रह केला. गलिव्हरने नम्रतेने नकार दिला. तेव्हा त्याचे म्हणणे मान्य करून राजाने त्याला काही मदतही देऊ केली. गलिव्हरने जहाजाच्या दुरुस्तीसाठी सर्व प्रकारची मदत त्याच्याकडून घेतली. मोठी मोठी झाडे तोडून त्याच्या फळ्या करून त्या जहाजाच्या ज्या फळ्या

मोडल्या होत्या त्यांच्या ठिकाणी त्याने जोडल्या, वल्ही तयार केली आणि सुकाणू तयार केले. शेकडो शिंप्यांनी छोटे तागाचे तुकडे एकत्र शिवून जहाजाची शिडे तयार केली. ती शिडे गलिव्हरने जहाजावर बसविली. जहाज पूर्णतया दुरुस्त झाले.

राजाची परवानगी घेऊन गलिव्हर निघाला. आपण जगाच्या कोणत्या भागात आहोत, आपला इंग्लंड देश कोणत्या बाजूला असेल, याची काहीच कल्पना त्याला नव्हती. केवळ मायभूमीला भेटण्याच्या तळमळीने तो हे एक नवीन साहसच करायला उद्युक्त झाला होता. राजाने त्याला परवानगी तर दिलीच होती, पण त्याला पाहिजे असलेली सर्व प्रकारची मदतही दिली. फळे, धान्य, पीठ, मांस वगैरे भरपूर अन्नपुरवठा त्याने दिला होता. काही जिवंत गाई आणि शेळ्याही गलिव्हरने आपल्याबरोबर घेतल्या होत्या. कदाचित आपल्या देशात गेलोच तर ह्या अजब छोटेखानी देशातील छोटे प्राणी त्यांना दाखवावेत हा त्याचा हेतू होता. काही माणसेही बरोबर घेण्याचा त्याचा विचार होता. पण राजाने त्याला तसे करू दिले नाही. कदाचित आपल्याला फसवून हा माणसे घेऊन जाईल ह्या संशयाने त्याने नोकरांकडून त्याचे खिसेही तपासून घेतले. राजाचा निरोप घेऊन गलिव्हरचे जहाज सागरमार्ग आक्रमू लागले.

पूर्वेच्या सागरातून सूर्य वर यावयाचा, दिवसभर डोक्यावर तळपायचा आणि संध्याकाळचा मुहूर्त साधून पश्चिमेच्या सागरात बुडी घ्यावयाचा. ह्याखेरीज दुसरी स्थित्यंतरे काही गलिव्हरला पाहावयास मिळाली नाहीत. असेच एक दोन दिवस गेले. मध्यन्तरी एक दोन खडकाळ बेटे आढळली पण त्यांमध्ये काही ओळखीची खूण मिळाली नाही. तिसरा दिवसही नेहमीप्रमाणेच उजाडला. पश्चिमेच्या क्षितिजावर मधूमधून नकाळे-पांढरे त्रिकोण आढळायचे. कधी कधी नुसताच भास असावयाचा. कधी कधी

ते एखादे डोंगराळ खडकाळ बेट ठरावयाचे. असेच काही तरी असेल, असे म्हणून आपल्या हातांतले आळसटलेले वल्हे पाण्यावर मारीत गलिव्हरने प्रथम तिकडे दुर्लक्षच केले. पण नंतर सहज एकदा त्याची नजर त्या दिशेला गेली तर तो पांढरा त्रिकोण अधिक स्पष्ट आणि मोठा झाला असल्याचे त्याला दिसले. मग त्याने जास्त लक्षपूर्वक पाहिले. त्याची खात्री झाली, ते जहाजाचे पांढरे शीड होते.

आता त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्याचे आळसटलेले वल्हे जास्त जोराने पाणी तोडू लागले. हळूहळू त्याचे जहाज त्या जहाजाकडे जाऊ लागले. मधून मधून आपल्याजवळची पांढरी चादर हवेत उडवून तो त्या जहाजावरील लोकांना इशारा देत होता. त्यांचे लक्ष गलिव्हरच्या जहाजाकडे गेले आणि त्यांनी जहाजाचे तोंड वळविले. तोंड वळताच त्यावर फडकणारे युनियन जॅक, इंग्लंडचे निशाण गलिव्हरला दिसले. त्याला आपल्या मायभूमीचे दर्शन झाल्याचा आनंद झाला. त्याने आपले जहाज त्या मोठ्या जहाजाजवळ घेतले. त्या जहाजावरील खलाशांनी दोराची शिडी टाकली आणि गलिव्हरला जहाजावर घेतले. जहाजावरच्या खलाशांत एक गलिव्हरचा मित्र निघाला. गलिव्हरचे सर्व सामान त्यांनी आपल्या जहाजावर घेतले.

गलिव्हरने आपल्या प्रवासाची हकीकत त्या खलाशांना सांगितली. आपले विविध, चमत्कारिक अनुभव त्याने त्यांना सांगितले. आपण पाहिलेले लिलिपुटमधले आणि ब्लेफूस्कूमधले सहा इंची मानव, त्यांची छोटी घरे, फुलांच्या ताटव्याएवढी शेते, चार इंची गायी आणि दोन इंची मेंढरे हे सारे प्रकार त्या लोकांना खरेच वाटेनात. तेव्हा त्यांची खात्री पटविण्यासाठी गलिव्हरने आपल्याबरोबर आणलेल्या एक दोन गायी आणि एक दोन मेंढरे हळूच खिशातून बाहेर काढून तिथल्या एका पेटीवर ठेवली. त्याने त्यांच्यापुढे बरोबर आणलेले गवतही टाकले. छोटया सशा-

एवढी आणि पांढऱ्या उंदराप्रमाणे दिसणारी ती गवत खात असलेली गुरे पाहून ते सारे खलाशी पाहतच बसले. तोच जहाजाचा भोंगा वाजला. जहाज आता इंग्लंडच्या किनाऱ्याजवळ आले होते. सगळयांची गडबड सुरू झाली. जो तो आपले सामान आवरून उतरण्याची घाई करीत होता. त्या त्यांच्या घाईत गलिव्हरची एक दोन गुरे-मेंढरे चेंगरली गेली. बाकीची त्याने लगबगीने आपल्या पिशवीत ठेवून दिली म्हणून वाचली. गलिव्हरनेही आपले साामन आवरले. ह्या जहाजाच्या कप्तानाला उपकाराची परतफेड म्हणून ब्लेफूस्कूच्या राजाने दिलेली काही सोन्याची नाणी गलिव्हरने दिली.

एवढयात 'डाऊन्स' बंदर आले. जहाज बंदराला लागले. शिड्या किनाऱ्यावर टाकण्यात आल्या. सारे उतारू खाली उतरले. गलिव्हरही त्यांच्या मागोमाग उतरला. इतरांना त्यांची आप्तमंडळी, स्नेहीसोबती भेटावयास आले होते. गलिव्हरच्या घरचे कोणीच आले नव्हते. साहजिकच होते. गलिव्हर आज येणार, असे काही त्यांना माहीत नव्हते. त्याने टॅक्सी केली आणि रेड्रिफ परगण्यातील आपल्या घराकडे तो गेला. गलिव्हरने आपल्या घरात पाऊल टाकताच त्या घराला आनंदाचा फुलोरा चढला. सारीच मुखकमले आनंदाने फुलली. त्याची पत्नी ॲन, मुलगा जॉन आणि मुलगी जेन सारे जसे काही आनंदाने नाचत होते.

हे मालकीचे घर, त्याभोवतालची बाग आणि थोडीशी शेती यावर हे टुमदार घराणे मोठे सुखात राहत होते. आपल्याबरोबर आणलेल्या त्या छोटया गायींचे आणि मेंढरांचे छोटेसे प्रदर्शन ठिकठिकाणी भरवून गलिव्हरने बराच पैसा मिळविला. पण हे निष्क्रिय आळशी जीवन गलिव्हरला फार दिवस मानवेना. तो अगदी अस्वस्थ झाला होता.

इतक्यात लिव्हरपूल येथील कॅप्टन जॉन निकोलस ह्यांचे व्यापारी जहाज सुरतेला जाण्यासाठी निघणार आहे, ही बातमी त्याच्या कानां-वर आली. गलिव्हरच्या साहसी वृत्तीला नवे आमंत्रण मिळाले. पत्नीचा आणि मुलांचा निरोप घेऊन गलिव्हरने जहाजावर पाय ठेवला. त्या प्रेमळ जीवांनी त्याला अश्रुभरल्या नेत्रांनी निरोप दिला आणि जहाजाने इंग्लंडचा किनारा सोडला.

▣ ▣ ▣



# राक्षसांच्या देशात

## दुसरी सफर

# राक्षसांच्या देशात

इंग्लंडमधील दहा महिन्यांच्या वास्तव्यानंतर गलिव्हरच्या साहसी-वृत्तीने पुन्हा एकदा उचल घेतली. १७०२ च्या २० जून रोजी एक व्यापारी जहाज सुरतला जाण्यासाठी निघणार होते. कॅप्टन जॉन निकोलस हा प्रमुख कप्तान होता. गलिव्हरने ही संधी घेण्याचे ठरविले. कॅप्टन जॉनने त्याला मोठ्या आनंदाने मान्यता दिली. पत्नीचा आणि मुलांचा निरोप घेऊन गलिव्हर जहाजाच्या प्रयाणाच्या दिवशीच 'डाऊन्स'-मध्ये दाखल झाला. योग्य वेळेला जहाजाने किनारा सोडला. गलिव्हरचा पुन्हा एकदा प्रवास सुरू झाला. पहिले काही दिवस पाऊस,

वादळ ह्यांचा काही त्रास न होता अगदी पद्धतशीरपणे ते जहाज निळ्या सागरावरून संथपणे डुलत चालले होते. केप ऑफ् गुडहोपला म्हणजे आफ्रिकेला वळसा घालून पुढे मादागास्कर बेटाजवळून भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील सुरत बंदराला जहाज जावयाचे होते. केपपाशी आल्यानंतर जहाजामध्ये पाणी शिरत असल्याचे खलाशांच्या निदर्शनास आले. तेव्हा तिथे जहाज थांबविण्यात आले.

मार्चअखेर जहाजाला तिथे अडकून पडावे लागले. योग्य ती दुरुस्ती झाली आणि मग तिथून जहाज पुढे निघाले. त्यानंतर मादागास्कर सामुद्रधुनीपर्यंतचा प्रवास पुष्कळ सुखाचा झाला. त्यानंतर मात्र वाऱ्याने उग्र रूप धारण केले. एप्रिलपासून सुरू झालेले हे वादळी तडाखे मे च्या सुरुवातीपर्यंत जहाजाला सहन करावे लागत होते. नंतर म्हणजे मे च्या दोन तीन तारखेला समुद्र थोडा शांत झाल्यासारखा दिसत होता. पण ही वादळापूर्वीची शांतता असल्याचे त्या जाणकार कप्तानाने जाणले आणि आगामी तुफानाला तोंड देण्याची तयारी करण्याचे हुकूम त्याने सर्व खलाशांना दिले. कप्तानाचा अंदाज खराच ठरला. दुसऱ्या दिवशी दक्षिण दिशेकडून जोराचे मोसमी वारे वाहू लागले. वादळाचे तांडव अती भयानक होते. ह्या वादळाने आणि नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याने जहाज त्याच्या मूळच्या मार्गापासून किती तरी दूर नेले गेले. त्या जहाजावरच्या अगदी जुन्या मुरब्बी खलाशाला देखील सांगता येईना, जहाज कुठल्या भागात असावे ते. सारे खलाशी आपल्या कामात वाकबगार होते, अन्नपुरवठा भरपूर होता; पण भलत्याच भागात अडकून पडल्यामुळे पाण्याअभावी मात्र साऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते. उत्तरेकडे जाण्याऐवजी आहे त्याच मार्गाने जहाज जाऊ द्यावे असाच सर्वांचा विचार होता. कारण कदाचित उत्तरेला जाऊन गोठलेल्या समुद्रात गारठून पडण्याची भीती होती.

वादळ थोडे शांत झाल्यावर डोलकाठीवरून टेहळणी करणाऱ्या मुलाने जमीन दिसल्याचे आनंदाने येऊन सांगितले. ते बहुधा खडकाळ बेट असावे असा अंदाज कप्तानाने बांधला. दुर्बिणी सरसावून तांडेलाने पाहिले, तेव्हा त्या बेटाच्या अलीकडे जहाज नांगरण्याइतके खोल पाणी असलेली खडकाळ खाच आढळून आली. ताबडतोब जहाज तिकडे वळविण्यात आले. त्या पट्टीत जहाज नांगरले गेले आणि कप्तानाने काही माणसांना पाण्याच्या पिशव्या घेऊन बेटावर पाठविले. कुठे झरे, ओढे आढळले तर पाणी घेऊन येण्यास त्याने त्यांना सांगितले होते. गलिव्हरही त्या माणसांबरोबर गेला. जेव्हा ही सारी माणसे जमिनीवर इकडे तिकडे पाणी शोधत हिंडू लागली तेव्हा त्यांना कुठे नदी आढळली नाही की झरा दिसला नाही. एवढेच काय, पण मनुष्यवस्ती त्या ठिकाणी असावी अशा काही खाणाखुणाही कुठे सापडल्या नाहीत. इतरांच्या पेक्षा जरा जास्तच दूर गलिव्हर जाऊन आला. तो परत जहाजापाशी आला तेव्हा त्याच्या बरोबरचे सारे सहकारी जहाजाकडे जाण्यासाठी नावेतून निघाले होते. गलिव्हरने मोठमोठ्याने ओरडून त्यांना हाका मारण्याचा प्रयत्न केला. एक दोन हाका गलिव्हरने मारल्या असतील नसतील तोच त्याची बोबडी वळली आणि तो त त प प करू लागला. भयंकर दृश्य त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले. त्याचा त्याच्या दृष्टीवर विश्वासच बसेना.

एक भयंकर आकाराचा प्राणी त्या नावेच्या मागे लांब लांब टांगा टाकीत चालला होता. जेवढ्या पाण्यातून ती नाव वेगाने चालली होती तेवढ्या पाण्यात त्या राक्षसी प्राण्याचे गुडघे कसेबसे बुडत होते. त्याने आपला लांबलचक हात ती नाव पटकन उचलण्यासाठी पुढे टाकला. पण ती नाव शिताफीने निसटली आणि जहाजाच्या जवळ गेली. आता पाणी वाढले होते. नावेतल्या माणसांना झटकन उचलून घेऊन जहाज खाचेतून

बाहेर पडून अथांग सागरात शिरले आणि मग मात्र त्या राक्षसप्राण्याला हात चोळीत बसण्याखेरीज दुसरा मार्ग राहिला नाही.

गलिव्हर मात्र हा सारा प्रकार पाहायला तिथे राहिला नाही. तो परत जमिनीकडे धावत गेला. उंच सुळक्यासारखी टेकडी होती. त्या टेकडीवर तो चढू लागला. वर शिखरावर गेल्यावर तिथून सारा आसपासचा प्रदेश त्याने बधितला. जे दिसले ते पुष्कळसे आशादायक होते. सगळीकडे अगदी हिरवेगार दिसत होते. मशागत केलेल्या, लागवड केलेल्या जमिनी इतस्ततः विखुरलेल्या होत्या. ह्या साऱ्या हिरव्या सृष्टीवरून गलिव्हरची विहंगम दृष्टी फिरत असता ती मधेच एकदम आश्चर्याने थबकली आणि ह्या आश्चर्याचा विषय होता गवताळ कुरणामध्ये वाढलेले वीस फूट उंचीचे गवत.

नंतर टेकडीच्या पलीकडच्या अंगाला उतरून गलिव्हर एका चांगल्या मोठ्या रस्त्याने चालू लागला. त्याला तो मोठा राजरस्ताच वाटला. पण खरे म्हणजे, शेतामधून जाणारी बांधावरची ती एक साधी पायवाट होती. दोन्ही बाजूंचे गवत चांगले चाळीस चाळीस फूट उंच वाढलेले असल्याने गलिव्हरला दोन्ही बाजूंला काहीच पाहता येत नव्हते. एखाद्या बंदिस्त रस्त्यातून जसा काही तो जात होता. शेताच्या भोवती शंभर शंभर फूट उंच कुंपणे घातली होती. एका शेताचा बांध संपला की तो पायऱ्यांनी उतरावा लागे आणि दुसऱ्या बांधावर चढावे लागे. ही साधी पायऱ्या चढण्या उतरण्याची गोष्ट देखील गलिव्हरच्या आवाक्यातली नव्हती. कारण एक पायरी सहा फूट उंच तर दुसरी वीस फूट. पायऱ्यांच्या दगडांच्या फटीतून गवत वाढलेले असे. ते धरून उतरण्याचा आणि चढण्याचा गलिव्हर प्रयत्न करीत असे. असाच प्रयत्न तो करीत असताना समोरच्या शेतातून त्या अज्ञात प्रदेशाचा एक रहिवाशी येत असताना त्याने पाहिला. समुद्रातून

लांब टांगा टाकीत गलिव्हरच्या सहकाऱ्यांच्या नावेचा पाठलाग करणारा प्रचंड प्राणी गलिव्हरने पाहिला होता. त्याचाच हा सख्खा भाऊ दिसत होता. एखादा उंच सुळक्यासारखा घुमट चालत यावा तसा तो दिसत होता. निदान दहा यार्डांचे अंतर तरी तो एका पावलात कापीत असावा असे गलिव्हरला वाटत होते. आश्चर्याने आणि भीतीने थरथरत तो झटकन गवतात दडून बसला. गवतातून हळूच डोकावून गलिव्हरने पाहिले. तो प्रचंड प्राणी एक विराट मानव होता. पलीकडच्या बांधावरून ह्या बांधावर येता येता त्याने मागे वळून कोणाला तरी उद्देशून आरोळी ठोकली. शेकडो तुताऱ्यांचा आवाज एकवटावा असा तो आवाज गलिव्हरला वाटला. त्याच्या आवाजाला साद देत त्याच्याचसारखे सात भयंकर राक्षस हातात खुरपी घेऊन आल. त्यांच्या आणि त्या पहिल्या राक्षसाच्या पोषाखातील फरकावरून हे सात राक्षस त्या पहिल्या राक्षसाचे नोकर असावेत, असे गलिव्हरने ठरवले आणि त्याचा तर्क बरोबरच ठरला. कारण त्या मालक राक्षसाने काही तरी गडगडत्या आवाजात म्हणताच त्या नोकर राक्षसांनी गवत-कापणीला सुरुवात केली. गलिव्हरला आपला देह लपविता लपविता ते राक्षसी गवतही अपुरे पडू लागले. तो पुढे पुढे सरकत होता आणि गवतकापणीची मोहीम त्याच्या मागे मागे सरकत होती. शेवटी शेवटी त्याला पुढे सरकणे अशक्य होऊ लागले. कारण ते गवत अगदी दाट वाढलेले आणि गुंतागुंतीचे असे होते. खाली पडलेल्या कणसांची टोके चाकूसुऱ्यांसारखी अंगात घुसत होती. कापणी करणारे अगदी जवळ आले होते. त्याला काही सुचेना.

गलिव्हर घायाळ होऊन अगदी हताश स्थितीत पडला होता. बायकापोरांच्या सहवासातील सुखाचे जीवन सोडून हे जिवावरचे साहस करण्याची बुद्धी आपणास कोठून झाली, असे वारंवार त्याच्या मनात

येऊ लागले. लिलिपुटचे रहिवाशी आपणास राक्षस मानीत होते आणि आता ह्या राक्षसांपुढे आपण लिलिपुटचे रहिवाशी ठरलो हा विरोध क्षणभर त्याच्या मनात येऊन गेला. ह्या राक्षसांच्या तावडीत आपण सापडलो की आपली चटणी होणार हा खेदजनक विचार त्याला अस्वस्थ करू लागला. ह्या विचारांनी गलिव्हर अस्वस्थ झाला असतानाच एक कापणी करणारा राक्षस त्याच्यापासून अगदी दहा यार्डांच्या अंतरावर आला. त्याचे दुसरे पाऊल पडले की आपण चिरडले जाणार अशी गलिव्हरची अगदी खात्री झाली. त्यासरसा तो एकदम किंचाळला. कसला तरी आवाज झाला असे वाटून त्या राक्षसाने इकडे तिकडे बघितले. बघता बघता त्याची नंजर झटकन खाली गलिव्हरकडे गेली. घरटयातून खाली पडलेल्या एखाद्या चिमणीच्या पिलाकडे एखाद्या मुलाने जसे कुतूहलाने पाहावे तसे गलिव्हरकडे पाहत त्या राक्षसाने गलिव्हरला अलगद उचलून आपल्या हातात घेतले. जमिनीपासून साठ फूट वर गलिव्हर उचलला गेला होता. तो आपल्या हातातून निसटू नये म्हणून त्या राक्षसाने त्याला अगदी गच्च धरले होते. त्याला वेदना अगदी सहन होत नव्हत्या. तो कळवळून सोडून देण्याविषयी त्या राक्षसाला सांगत होता. त्या राक्षसाला कळत नव्हते काहीच. पण गंमत मात्र वाटत होती त्याला. त्याने एक मोठे गगनभेदी हास्य करून गलिव्हरला आपल्या पैरणीसारख्या लांब अंगरख्याच्या खिशात ठेवले आणि तो धावतच आपल्या मालकाकडे गेला.

त्या नोकराने आपल्या खिशातल्या गलिव्हरला बाहेर काढून मालका-पुढे धरले. गलिव्हरला पाहताच मालकाचे आणि साऱ्या नोकरांचे आश्चर्य अगदी शिगेला पोहोचले. त्या मालकाने नोकराला गलिव्हरला खाली जमिनीवर ठेवण्यास सांगितले. जमिनीवर गलिव्हर चालू लागला. गुडघ्यावर बसून ते सारे राक्षस गलिव्हरच्या हालचालीकडे मोठ्या

कौतुकाने पाहत होते. असे चालते बोलते आश्चर्य त्यांनी कधीच पाहिले नव्हते. गलिव्हरने आपल्याजवळची पिशवी त्या मालकापुढे केली. आपल्याजवळच्या टाचणीने त्याने ती उचलून पाहिली. त्याला काही समजेना. शेवटी गलिव्हरने त्यातली सोन्याची नाणी त्याच्या हातावर ठेवली. गलिव्हरचे बोलणे जसे त्यांना अर्थशून्य होते तशीच ती नाणी. परत ती नाणी पिशवीत ठेवण्यास सांगितले. त्या शेताच्या मालकाने गलिव्हरशी बोलण्याचा बराच प्रयत्न केला. पण कानठळ्या बसण्याव्यतिरिक्त गलिव्हरला काही बोध झाला नाही. गलिव्हरनेही निरनिराळ्या भाषांतून त्याच्याशी बोलून बघितले. शेवटी शब्दांच्या भाषेपेक्षा खुणांचीच भाषा कदाचित प्रभावी ठरेल असे वाटून त्या शेतकऱ्याने आपल्या खिशातला रुमाल काढून त्याची घडी करून ती खाली ठेवली आणि तीवर उभे राहण्यास गलिव्हरला खुणेने सांगितले. त्या शेतकऱ्याचा हेतू लक्षात येऊन गलिव्हर त्या रुमालाच्या घडीवर चढला. चढला म्हणायचे कारण ती रुमालाची घडी फूटभर जाडीची होती. नंतर एखाद्या मुलीने छोटीशी कापराची बाहुली दुपट्यात गुंडाळून घ्यावी त्याप्रमाणे त्या शेतकऱ्याने त्याला आपल्या रुमालात गुंडाळून घेतले आणि आपल्या घरी नेले. घरी गेल्यावर त्याने आपल्या बायकोला बोलावले आणि गलिव्हरला हलकेच टेबलावर ठेवले. रुमालाच्या घडीतून बाहेर पडणाऱ्या गलिव्हरला पाहताच बेडूक पाहून जशी एखाद्या स्त्रीने दचकून उडी मारावी तशी त्या शेतकऱ्याच्या बायकोने दचकून टुणकन उडी मारली. पण नंतर मात्र त्या शेतकऱ्याच्या खुणांप्रमाणे गलिव्हरने मागेपुढे होणे, बसणे, उठणे वगैरे प्रकार केलेले तिने पाहिले तेव्हा आपल्या करमणुकीसाठी आपल्या नवऱ्याने हा एक नवा पाळीव प्राणी आणला आहे अशी तिची खात्री झाली आणि पुन्हा काही तिने टुणकन उडी मारली नाही.

ते शेतकऱ्याचे कुटुंब चांगले सहा-सात माणसांचे होते. सगळे एका टेबला-भोवती भोजनासाठी बसले. ते गोल टेबल चांगले चोवीस फूट व्यासाचे



होते. त्यावरच एका बाजूला गलिव्हरला त्यांनी बसविले. पोपटापुढे जशी पेरूची फोड टाकावी तसा एक मांसाचा तुकडा त्या मालकिणीने गलिव्हर-पुढे टाकला. खिशातले काटे चमचे काढून गलिव्हरने तो खाण्यास सुरवात केली तेव्हा त्या शेतकरी कुटुंबाला केवढे नवल वाटले. पाणी पिण्या-साठी त्यांनी जे भांडे भरून गलिव्हरपुढे ठेवले ते दोन गॅलनचे होते.

पण गलिव्हरने त्याचा अनादर केला नाही. इंग्लिशमध्ये त्याने त्यांचे आभार मानले. तेव्हा ते सारे कुटुंब इतके खदखदून हसले की गलिव्हर दोनदा टेबलावर टुणकन उडला. त्या शेतकऱ्याच्या दहा वर्षांच्या मुलाने तर गलिव्हरला एक पाय धरून वर उचलले. जसे कुत्र्याचे पिल्लू तंगडी धरून खटयाळ मुलाने उचलावे त्याप्रमाणे. शेतकऱ्याने त्याला खडसावले आणि म्हणून गलिव्हरची सुटका झाली त्या मुलाच्या तावडीतून. तोच मालकिणीच्या जवळ बसलेल्या एका भयंकर प्राण्याला पाहून गलिव्हरचे धाबे दणाणले. बैलाच्या तिप्पट मोठे असे ते जनावर म्हणजे त्या घरातले पाळलेले मांजर होते. त्याच्या दृष्टीने गलिव्हर म्हणजे उंदीरच. पण शेतकऱ्याने धिटाईने गलिव्हरला या मांजरापुढे उभे केले तर ते मांजरच लाडात गुरगुरत मालकिणीजवळ सरकले. त्या शेतकऱ्याच्या घरात मोठे दोन-तीन शिकारी कुत्रे होते. एक एक कुत्रा हत्तीच्या चौपट मोठा होता. जेवण संपत आले होते. इतक्यात घरातली एक दाई एका लहान मुलाला कपड्यामध्ये गुंडाळून घेऊन तिथे आली. ते त्या शेतकऱ्याचे सर्वांत धाकटे मूल होते. असावे वर्षाभराचे. त्या दाईने ते मूल त्या शेतकऱ्याच्या बायकोजवळ दिले. आईजवळ जात असतानाच त्या बाळाचे लक्ष गलिव्हरकडे गेले. खरे म्हणजे गलिव्हरवर धाडच येणार होती त्या राक्षसबाळाची, पण आईच्या वात्सल्याने त्याला झटकन् ओढून घेतले म्हणूनच गलिव्हर वाचला.

जेवणे झाली आणि गलिव्हरची काळजी घेण्यास आपल्या पत्नीला बजावून तो शेतकरी शेतावर गेला. त्याच्या पत्नीने गलिव्हरला आपल्या बिछान्यावर झोपविले आणि त्यावर आपला रुमाल पांघरला. दोन-तीनशे फूट लांब रुंद आणि तितकीच उंच अशा त्या खोलीत गलिव्हर एकटाच होता. इतक्यात काही तरी आवाज होऊन गलिव्हर जागा झाला. पाहतो तो दोन प्रचंड उंदरांनी त्याच्यावर हल्ला चढविला.

दिसायला उंदरासारखे होते म्हणून त्यांना उंदीर म्हणावयाचे; नाहीतर आकाराने ते हत्तीच होते. मोठे प्रसंगावधान राखून गलिव्हरने जवळचे खुरपे घेऊन त्या उंदराच्या डोक्यावर मारले. तो घायाळ होऊन खाली पडला. आपला मित्र धारातीर्थी पडलेला पाहून त्याचा मित्र पळाला. मालकीण खोलीत आल्यावर हा सारा प्रकार पाहून तिचा जीव अगदी उडून गेला, पण गलिव्हरला सुरक्षित पाहून परत तो भांड्यात पडला.

त्या शेतकऱ्याची एक आठ-नऊ वर्षांची मुलगी होती. ती चांगली चाळीस फूट उंचीची होती. गलिव्हर पूर्णपणे तिच्या देखरेखीखाली असायचा. तिला उत्तम विणकाम, शिवणकाम येत होते. तिने मोठ्या हौसेने गलिव्हरकरता कितीतरी कपडे शिवले होते. तिने शक्य तितके मऊ, पातळ कापड घेतले होते गलिव्हरला मात्र गोणपाटाचे कपडे अंगात चढवल्याप्रमाणे वाटे. गलिव्हर आपले आपण कपडे अंगात घालीत असे व काढीत असे. त्या मुलीला मात्र त्याचे हे काम स्वतः करण्यात मोठी हौस वाटत असे. तिने त्याच्यासाठी एक छोटासा पाळणा तयार करवून घेतला होता. तो पाळणा मध्यवर्ती असलेल्या एका कपाटामध्ये तिने ठेवला होता. त्यामुळे उंदरांपासून तो अगदी सुरक्षित राहिला होता. ती त्याला आपली भाषा शिकवीत असे. त्याची सगळीच देखभाल ती करीत असे. तिचे नाव बरेचसे अवघड होते. गलिव्हर मात्र तिला छोटी आयाच म्हणत असे.

त्या शेतकऱ्याला त्याच्या शेतामध्ये अगदी छोटा पण अगदी माणसासारखा एक अजब प्राणी सापडल्याची वार्ता सगळीकडे हां हां म्हणता पसरली. आसपासचे शेतकरी कुतूहलाने गलिव्हरला पाहायला येत आणि मग त्यांच्यापुढे गलिव्हरचे प्रदर्शन होई. मालकाच्या हुकुमाप्रमाणे टेबलावर चालणे, पाहुण्यांना नमस्कार करणे आणि त्या मुलीने शिकविल्याप्रमाणे त्यांच्या भाषेत त्या पाहुण्यांच्या स्वागताचे चार शब्द बोलणे

ह्या साऱ्या कसरती गलिव्हरला करून दाखवाव्या लागत असत. काही माणसे तर त्याला चष्मा डोळयावर चढवून न्याहाळून पाहत असत. त्यांतल्या एका माणसाने शेजारच्या गावात बाजाराच्या दिवशी गलिव्हरचे प्रदर्शन मांडले तर चांगले पैसे मिळतील, असे शेतकऱ्याला सुचविले. त्याचा कानमंत्र शेतकऱ्याला चांगलाच पटला. त्यांचे बोलणे गलिव्हरला समजले. त्यांच्या दृष्टीने त्यांची ती कुजबूज असली तरी त्याच्या दृष्टीने साऱ्या गावाला ऐकू जाईल असे ते मोठे बोलणे होते. शिवाय त्या मुलीकडून त्याला हा सारा प्रकार कळला. त्याच्यापेक्षाही तिला जास्त वाईट वाटले. तिच्या वडिलांनी पूर्णपणे गलिव्हरला तिच्या स्वाधीन केले होते आणि आता ही पैसे मिळविण्याची योजना त्याने आखली होती.

दुसऱ्या दिवशी एका पिंजरेवजा पेटीत गलिव्हरला घेऊन तो शेतकरी शेजारच्या गावी गेला. रस्त्यावर फूटपाथवर बसणाऱ्या, ज्योतिष सांगणाऱ्या कुडमुड्या ज्योतिष्याजवळ जसा चिमण्यांचा पिंजरा असतो तसा हा पिंजरा होता. त्या पिंजऱ्याला एका बाजूला दार असते. ते त्या माणसाने उघडले की ती चिमणी हळूच बाहेर येते आणि रांगेने ठेवलेल्या पाकिटांतील एक पाकीट चोचीने बाजूला करते. अशी दाराची व्यवस्था त्या पिंजऱ्यालाही होती. त्या दारातून गलिव्हर आत जात असे किंवा बाहेर जात असे. आता गलिव्हर खराच पिंजऱ्यातला पोपट बनला होता.

त्या गावात गेल्यावर तो शेतकरी एका खानावळीत उतरला होता. खोलीतल्या एका टेबलावर त्याने गलिव्हरचा पिंजरा ठेवला होता. ती मुलगी त्याच्या शेजारी स्टुलावर बसून त्याची सारी देखभाल करीत होती. ती गलिव्हरला एखादी गवताची काडी द्यावयाची आणि मग तो काठीवरच्या उड्या करून दाखवायचा. तिथल्या त्या बाजारातले गलिव्हरचे

हे पहिलेच प्रदर्शन होते. तरी हजार-बाराशे माणसांनी देवाच्या दुनियेतल्या ह्या अजब्र प्राण्याचे दर्शन घेतले असेल. जे जे त्याला पाहत ते इतरांना आपल्याला वाटलेले आश्चर्य अगदी तोंड भरून सांगत. मग ते लोक अगदी गर्दी करून येत. गलिव्हरला ह्या आडदांड माणसांकडून काही इजा पोचू नये म्हणून तो शेतकरी आणि त्याची मुलगी अगदी डोळ्यात तेल घालून जपत. ज्या मोकळ्या जागेत त्यांनी हे गलिव्हर प्रदर्शन थाटले होते तिथे मध्यभागी एका टेबलावर गलिव्हरचा पिंजरा ठेवला होता आणि टेबलापासून चांगले दहा दहा यार्ड अंतरावर चहू-बाजूंनी बाक ठेवले होते. त्या बाकांच्या आत येण्याची सक्त मनाई होती. इतका सारा बंदोबत केला असूनही एका वात्रट पोराने एक दगड गलिव्हरकडे भिरकावलाच. त्या मुलीने गलिव्हरला झटकन बाजूला घेतले म्हणूनच तो केवळ वाचला. नाहीतर शंभरीच भरली होती त्याची. कारण तो दगड चांगला भोपळ्याएवढा होता. अंधार पडू लागला तरी गर्दी वाढतच होती. शेवटी ‘ प्रदर्शन बंद ’ अशी दवंडी पिटून पुढच्या बाजाराला पुन्हा हेच प्रदर्शन दाखविण्यात येईल असा हवाला शेतकऱ्याने दिला म्हणूनच गर्दी हटली. लोक आपआपल्या घरी जाऊ लागले आणि मग ह्या प्रदर्शन मंडळींनी सर्व आवराआवर करून घरचा रस्ता धरला.

त्या शेतकऱ्याला गलिव्हर म्हणजे लोखंडाचे सोने करणारा एखादा परीसच भेटल्याप्रमाणे वाटला. दर आठवड्याच्या बाजाराला, जत्रेच्या वेळी आसपासच्या बहुतेक सर्व गावांत गलिव्हरचे प्रदर्शन भरवून त्याने भरपूर पैसा मिळविला. आता खेडी हिंडण्यात त्याला समाधान वाटेनासे झाले. त्याची लोभी नजर शहराकडे वळली. एक दिवशी तो, त्याची मुलगी आणि घरातला एक हरकाम्या गडी बरोबर गलिव्हरला घेऊन निघाले. तिघेही प्रवासाचे सर्व सामान घेऊन घोड्यावरून निघाले. साऱ्या प्रवासात

त्या मुलीने गलिव्हरच्या पिंजरा अगदी उराशी आवळून धरला होता. वीस पंचवीस मैलांवर एक एक मुक्काम टाकीत ही प्रवासी मंडळी निघाली होती. त्यांचे अंतिम उद्दिष्ट चांगले हजार मैलांवर होते. पण एकसारखी घोडदौड केल्याने गलिव्हर थकेल असा विचार करून आणि आपण दमल्याचे निमित्त करून शेतकऱ्याची मुलगी वडिलांना ठिकठिकाणी मुक्काम करायला लावी. पैशाच्या मागे लागलेले तिचे वडील तो मुक्काम अगदीच काही कोरडा घालवीत नसत. गलिव्हरचा पिंजरा खाली ठेवला म्हणजे चार माणसे न सांगताच गोळा होत आणि मग चार पैसे टाकीत. दहा आठवड्यांच्या प्रवासानंतर ही सारी प्रवासी माणसे मुक्कामाला पोहोचली. ते त्या देशातले एक मोठे वैभवशाली शहर होते. त्या शहराचे भूषण ठरावे अशाच एका अलिशान पथिकाश्रमात हे सारे पथिक उतरले होते. हा पथिकाश्रम अगदी राजमार्गावर राजवाड्यासमोर होता. त्या पथिकाश्रमात शेतकऱ्याने एक भला मोठा दिवाणखाना भाड्याने घेतला. बाहेर सूचना-फलकावर गलिव्हरच्या वर्णनासहित प्रदर्शनाच्या सूचना लावण्यात आल्या. लोकांची रीघ लागली. दिवसातून दहा खेळ होत गलिव्हरच्या प्रदर्शनाचे. त्या शेतकऱ्याच्या मुलीने गलिव्हरला आपली भाषा शिकविली होती. इतकी लहान मूर्ती पाहिल्यावरच सारे आश्चर्यचकित होत आणि आता तर तो त्यांची भाषा बोलू शकत होता. मग काय, ज्याच्या त्याच्या तोंडी एकच विषय - छोटा मानव आणि त्याचा मोठा पराक्रम.

गलिव्हरच्या ह्या दैनंदिन प्रदर्शनामुळे त्याच्या मालकावर लक्ष्मीची कृपा होऊ लागली. त्याची हाव जास्तच वाढू लागली. पण ह्या दगदगीचा गलिव्हरच्या प्रकृतीवर मात्र वाईट परिणाम होऊ लागला. तो दिवसें-दिवस जास्त जास्त अशक्त होऊ लागला. गलिव्हरच्या शरीराचा सापळा त्या शेतकऱ्यालाही पाहवत नसे. पण तो लाभाच्या सापळ्यातून सुटतही नसे.

एक दिवशी राणीचा संदेश आला शेतकऱ्याला, ‘ छोटा मानव घेऊन तावडतोब आमच्या भेटीला या. ’ शेतकऱ्याला ही पर्वणीच वाटली. तो तावडतोब गलिव्हरला घेऊन राणीच्या दर्शनाला गेला. गलिव्हरने अतिशय नम्रतेने राणीला अभिवादन केले आणि तिच्याच भाषेत तिचे कुशल चिंतिले. शेतकऱ्याच्या मुलीने त्याला आपली भाषा उत्तम शिकविली होती. राणी अगदी खूष झाली आणि तिने गलिव्हरला विकत घ्यावयाचे ठरविले. शेतकऱ्याला तर ही महापर्वणी लाभली. त्याने लगेच संमती दिली. सौदा झाला. सोने गाठीस बांधून शेतकरी घरी गेला. गलिव्हर राणीच्या महालात राहिला. गलिव्हरच्या विनंतीला मान देऊन राणीने त्या शेतकऱ्याच्या मुलीलाही गलिव्हरबरोबर महालात राहण्यास परवानगी दिली.

नंतर राणीच्या मांडीवर बसून गलिव्हरने आपली सारी हकीकत राणीला सांगितली. त्याच्या साहसी जीवनाची कथा ऐकून राणीला आश्चर्य वाटले. इतक्या छोट्याशा प्राण्याचे अस्खलित बोलणे आणि बुद्धिचातुर्य पाहून तर तिच्या कौतुकाला पारावार राहिला नाही. आपल्या आश्चर्याचा आणि कौतुकाचा थोडासा वाटा राजाला द्यावा म्हणून आपल्या तळहातावर गलिव्हरला घेऊन ती राजाच्या महालात गेली. गलिव्हर पडण्याच्या भीतीने तिच्या हाताला अगदी बिलगून बसला होता. राजाला प्रथम काहीच कल्पना आली नाही. राणीच्या हाताकडे पाहत तो म्हणाला, ‘ पाली, सरडे बाळगण्याची हौस राणीसाहेबांना कधी-पासून आली ? ’

राणी काहीच बोलली नाही. तिने गालातल्या गालात हसत हळूच गलिव्हरला खाली सोडले. गलिव्हर तुरूतुरू चालत राजापुढे गेला आणि सौजन्याने अभिवादन करून म्हणाला, ‘ नमस्ते महाराज, आपले कुशल आहे ना ? ’

राजाला मोठे नवल वाटले. पाली, सरडे, बेडूक असे नुसते ओरडणारे प्राणी त्याने पाहिले होते. पण असा छोटा बोलका मानव त्याने कधी पाहिला नव्हता. परमेश्वराची ही अद्‌भुत किमया आहे असेच त्याला वाटले.

त्याच्यासारखेच विद्वान् शास्त्रज्ञांचे, पंडितांचे मत पडले. गलिव्हरची आकृती त्यांच्या देशातील पाली-सरडयांएवढी होती पण भिंतीवर झाडावर चढणे वगैरे जी विशेष सामर्थ्ये त्या प्राण्यांमध्ये होती ती काही गलिव्हरमध्ये नव्हती. सृष्टिनियमांना धरून त्याची निर्मिती नाही, सबब तो आभाळातनंच पडला असला पाहिजे, असे त्यांना वाटले. गलिव्हरच्या शिक्षणासाठी ह्या विद्वान् पंडितांची राजाने मुद्दाम नेमणूक केली होती. त्या विद्वान् शास्त्रज्ञांनी शेवटी गलिव्हरला त्याची हकीकत सांगायला सांगितले तेव्हा गलिव्हर म्हणाला,

‘ मी येथून शेकडो मैल दूर असलेल्या देशातला रहिवाशी आहे. तेथे माझ्यासारखे, माझ्याएवढे लाखो स्त्रीपुरुष आहेत. तिथले इतर प्राणी, तिथली झाडे वगैरे सर्व काही आमच्या प्रमाणात आहे. तुमचे हे अवाढव्य जग आहे. आमचे प्रमाणबद्ध असे जग आहे. ’

हे गलिव्हरचे बोलणे शास्त्रज्ञांना काही खरे वाटले नाही. पूर्ण विचारांती राजाला मात्र ते खरे असावे असे वाटले. त्याने राणीला गलिव्हरची उत्तम काळजी घ्यायला सांगितले. राज्यातल्या एका कुशल कारागिराला बोलावण्यात येऊन गलिव्हरसाठी एक स्वतंत्र खोली तयार करण्यात आली. त्या राजवाड्यातल्या विशाल महालाच्या मानाने गलिव्हरची खोली म्हणजे एक छोटेसे कपाटच होते. त्या खोलीत दोन खुर्च्या, एक टेबल, एक छोटे कपाट ठेवण्यात आले होते. खोलीला दोन दारे ठेवण्यात आली होती आणि उंदराची भीती राहू नये अशी व्यवस्था करण्यात आली होती. शक्य तितके पातळ, हलके, तरी ते ब्लँकेटइतके जाड

होते. रेशमी कापड मिळवून गलिव्हरचे कपडे करण्यात आले होते. आणि पूर्वीप्रमाणे ती शेतकऱ्याची मुलगी त्याच्या दिमतीला होतीच.

गलिव्हर राणीच्या अगदी मर्जीतला झाला होता. त्याचे जेवण देखील राणीच्या समवेत व्हावयाचे. नाजूक तब्येतीमुळे राणीचे जेवण बेताबाताचेच होते. तरी दहा-बारा माणसांचे जेवण व्हावे एवढा बेताचा घास राणीच्या कोमल हातामार्फत तिच्या तोंडात जाताना पाहिला की गलिव्हरच्या तोंडातला एक घास मात्र जरा वेळ तोंडातच घुटमळत असे. एखाद्या मोठ्या पिपाप्रमाणेच तिचे पाणी प्यावयाचे चांदीचे भांडे होते. दर बुधवारी सर्व राजघराण्याचे एकत्र जेवण असे. ह्या पंक्तीचा लाभ गलिव्हरला मिळत असे. राजपुत्रांना गलिव्हरशी गप्पा मारीत जेवण्यात मोठी गंमत वाटत असे. ह्या गप्पांच्या ओघात ते राजपुत्र इंग्लंडची राणी, प्रधान, पार्लमेंट ह्याबद्दल कुचेष्टेने बोलत. ते म्हणत, 'ही एवढीशी चिमुरडी माणसे कुठे घरटी, कुठे छोटी घरकुले तयार करतात त्यांना घरे म्हणतात, चार घरे एकत्र झाली की त्यांना गावे म्हणतात. ह्यांचे सगळेच काही लहान पण गप्पा मात्र मोठ्या.' गलिव्हर संतापाने लाल होई पण तेही त्यांना गंमतीचे वाटे. ह्या साऱ्या मोठ्यांच्या सहवासात तो आपला छोटेपणा पुष्कळ वेळा विसरूनही जायचा. एकदा राणीशेजारी तो उभा होता. दोघे आरशासमोर उभे होते. त्या अतिविशाल राणीच्या शेजारी उभी असलेली एक अती खुजी बारीकशी आकृती पाहून गलिव्हरही खो खो करून हसू लागला. पण ती छोटी आकृतीही हसत असलेली जेव्हा त्याने पाहिली तेव्हा त्याच्या लक्षात आले की आपण आपल्यालाच हसत आहोत.

'अहारे बावळट, स्वतःच स्वतःला पाहून हसतो आहे.' हे शब्द ऐकून मात्र गलिव्हर रागावला. त्याने मागे वळून पाहिले तो त्या राज्यातला सर्वात खुजा मनुष्य होता. तरी तो तीस फूट उंचीचा होता.

पण त्या शंभर फुटी राक्षसांच्या मानाने तो खुजाच होता. खुषमस्कऱ्या म्हणून राजाच्या दरबारात त्याची नेमणूक झालेली. त्याने केलेली ही चेष्टा गलिव्हरला सहन झाली नाही. तेव्हा हा सहा फुटी मानव चवडयावर उभा राहून इंचा दोन इचांनी उंची वाढवून त्या तीस फुटी खुजाकडे पाहण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, ' खुजट तो खुजट, आणि दुसऱ्याला बावळट म्हणतोय.'

गलिव्हरने त्या खुजाला खुजट म्हटले म्हणजे अगदी वर्मावरच बोट ठेवले. त्याने गलिव्हरचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. ती प्रतिज्ञा पूर्ण करण्याची संधीही लवकरच चालून आली. एक मोठे दुधाचे पातेले होते. दूध अगदी काठोकाठ भरले होते. गलिव्हर अगदी सहज आपल्या खोलीच्या बाहेर आला होता. त्याची देखभाल करणारी ती शेतकऱ्याची मुलगीही कुठे आसपास दिसत नव्हती. ही संधी साधून त्या खुजाने एक तंगडी धरून गलिव्हरला धरले आणि त्या पातेल्यात दिले भिरकावून. गलिव्हरला पोहता येत होते म्हणून तो थोडा वेळ तरंगत राहिला. हा प्रकार पाहून राणी तर मोठ्याने किंचाळलीच. इतक्यात ती शेतकऱ्याची मुलगी तिथे धावत आली आणि तिने गलिव्हरला मानगुटीला धरून वर काढले. संतापलेल्या राणीने मात्र त्या खुजाची राजवाड्यातून कायमची हकालपट्टी केली. गलिव्हरच्या मागची डोकेदुखी एकदाची कायमची थांबली.

राजवाडयाच्या बाहेर बाग होती. बागेत फुलेही पुष्कळ फुललेली असत. आणि बागेतल्या मधमाशा, गांधीलमाशा गुं गुं करीत पुष्कळ वेळा महालात येत. गलिव्हर जेवायला बसला म्हणजे तर त्या हटकून यायच्या आणि त्याच्या अन्नावर झडप घालायच्या. एक एक माशी म्हणजे चांगली एखाद्या पाखराएवढी. गलिव्हरजवळ एक पट्टी होती. त्या पट्टीने तो माशा मारीत असे. मग त्या बाहेर निघून जात. एखादू दुसरी मरून पडे.

मग तो तिची नांगी काढून पाहावयाचा. एक एक नांगी चांगली इंच दीड इंच लांबीच्या सुईएवढी असे.

ह्या राक्षसांचा देश म्हणजे एक द्वीपकल्पच होते. त्याच्या उत्तर-पूर्व बाजूला उंचच उंच पर्वतांच्या लांबवर पसरलेल्या ओळी होत्या आणि खाली तिन्ही बाजूंना सागराच्या लाटा गर्जना करीत खडकाळ किनारपट्टीवर आदळत होत्या. सुरक्षित असे बंदर नसल्याने इतर देशांशी ह्या देशाचा अजिबात संबंध आला नव्हता. अंतर्गत प्रवासाला उपयुक्त ठरण्याजोगी नद्यांची पात्रे मोठी होती. नद्यांमध्ये उत्तम मासे सापडत. क्वचित किनाऱ्यावर धडक घेणारी एखादी अजस्र लाट एखादा देवमास किनाऱ्यावर फेकीत असे.

राजधानीचे शहर बरेच मोठे होते. मधून मधून ती शेतकऱ्याची मुलगी गलिव्हरला घेऊन शहर पाहायला जात असे. राणीची खास घोडागाडी तिच्या दिमतीला असे. ती मुलगी एखाद्या कापराच्या बाहुलीला उचलून घ्यावे तसे गलिव्हरला घेत असे. ही गाडी एखाद्या प्रचंड सातमजली इमारतीएवढी होती. तिथल्या त्या लोकांना हे सारे विशेष नवलाचे नव्हते. गलिव्हरला मात्र प्रत्येक प्रचंड गोष्ट आश्चर्याचा धक्का देत असे. एक लंगडा भिकारी त्याला आढळला. त्याचे दोन्ही पाय लाकडी होते. ते तीस फूट उंचीचे होते. त्याच्या गलिच्छ कपड्यांवर आणि केसांत उवा चालताना स्पष्ट दिसत होत्या. चांगल्या उंदराएवढ्या. पण त्याला त्यांची जाणीवही नव्हती.

नगरसंचारासाठी गलिव्हरकरिता राणीने एक स्वतंत्र कपाट तयार करून घेतले होते. गलिव्हरच्या दृष्टीने ही एक खोलीच होती. त्या खोलीच्या चारी बाजूंना सुरेख खिडक्या होत्या. त्यांतून सारी राजधानी गलिव्हरला पाहता येत असे. ती शेतकऱ्याची मुलगी गाडीमध्ये आपल्या मांडीवर गलिव्हरचे हे छोटे कपाट घेऊन बसत असे. कधी कधी गाडीवान

आपल्या शेजारी हे कपाट ठेवीत असे. मग तर गलिव्हरची उत्तमच सोय होत असे. मध्ये मध्ये काही दुकानांशेजारी थांबल्यानंतर ती मुलगी गलिव्हरचे कपाट घेऊन खाली उतरायची. आणि मग गलिव्हरला पाहण्यासाठी तिथे लोकांची इतकी गर्दी जमायची की लोकांना आवरता आवरता त्या मुलीला आणि त्या गाडीवानाला अगदी नको जीव व्हायचा.

कधी कधी गलिव्हरची ही दैनंदिन फेरी बागा, देवळे पाहावयाला जायची. एकदा त्यांची गाडी अशाच एका प्रसिद्ध देवळापाशी थांबली. शेतकऱ्याच्या मुलीने गलिव्हरला कपाटातून काढून आपल्या हातात घेतले. पन्नास फूट उंचीच्या भव्य दरवाज्यातून त्यांनी देवालयात प्रवेश केला. इतक्या उंच दरवाज्यातून जातानाही लोक थोडे वाकून जात होते. देवाच्या प्रचंड मूर्तीवर लोक फुले वाहत होती. एका फुलातली एक मधमाशी फुलातून बाहेर पडली आणि गलिव्हरवर तिने हल्ला केला. गलिव्हर भिऊन पळू लागला. तिथे आलेले लोक हसू लागले. त्यांच्या हसण्याच्या दणदणाटाने सारे देऊळ हादरत असल्यासारखे गलिव्हरला वाटले. धावता धावता कशाला तरी त्याची धडक बसली. काही तरी फुटल्या–मोडल्यासारखा आवाज झाला. गलिव्हर खाली पडला. त्याच्या शेजारी चार फूट लांबीचा संगमरवरी दगडाचा तुकडा पडला होता. त्या तुकड्याखाली ती मधमाशी योगायोगाने सापडली आणि गलिव्हर त्या संकटातून सुटला आणि ह्या संकटात सापडला. शेतकऱ्याची मुलगी तिथे धावत आली. तिने गलिव्हरला कुरवाळून जवळ घेतले, त्याला कुठे लागले का पाहिले. मग तिचे लक्ष त्या संगमरवरी चार फुटी तुकड्याकडे गेले. तो उचलून ती म्हणाली, ‘ तुटली वाटतं ह्या देवीच्या पुतळ्याची करंगळी. आलीच होती सुटून. ’ तिने ती करंगळी आपल्याजवळच्या पाकिटात ठेवली आणि गलिव्हरला उचलून ती बाहेर गाडीकडे गेली.

तोच त्या मार्गावरून सैन्याची मोठी मिरवणूक चालली होती. साठ

साठ फूट उंचीचे उमदे घोडे, त्यांवर बसलेले भालाईत, मागे हत्ती, उंट सारे त्या प्रमाणात भव्य असे, आणि शेवटी राजाचा वैभवशाली रथ. अशी ती भव्य मिरवणूक पाहून गलिव्हरला केवढी धन्यता वाटली. ती मिरवणूक बरीच पुढे गेल्यावर शेतकऱ्याची मुलगी गलिव्हरला घेऊन गाडीत बसली. गाडी राजवाड्याकडे परतली.

कधी कधी गलिव्हर बागेतही फिरावयास जात असे. मोठमोठी फुलझाडे, फळझाडे फुलाफळांनी अगदी लगडलेली असत. त्याला उमललेल्या फुलांमध्ये सहज लपून बसता येईल इतकी मोठीसुद्धा काही फुले असत. फळे देखील ह्याच प्रमाणात चांगली मोठी होती. मोसंबी, सफरचंदासारखी फळे चांगली मोठ्या तांबड्या भोपळ्याएवढी होती.

गलिव्हरची काळजी वाहणारी त्याची ती दाई नेहमी त्याच्याबरोबर असे. ती त्याला त्याच्या पिंजऱ्यासह घेऊन जायची आणि मग एखादी निवाऱ्याची जागा पाहून बसायची. पिंजऱ्याचे दार उघडून गलिव्हर बाहेर यायचा आणि बागेत हिंडून जरा पाय मोकळे करायचा. पाने, फुले, फळे सारेच काही अजस्र. त्यांच्याकडे आश्चर्याने पाहत उभे राहण्यातच गलिव्हरचा किती तरी वेळ जात असे. एकदा तो एका सफरचंदाच्या झाडाखाली असाच पिकलेल्या सफरचंदांकडे पाहत उभा होता. एक एक सफरचंद हंड्याएवढे मोठे होते. ते लाल लाल रसाळ हंडे पाहण्यात तो इतका गुंगून गेला की, ते झाड गदागदा हालायला लागून पटापट सफरचंदे त्याच्या डोक्यावर आदळू लागली तेव्हा तो भानावर आला. पण त्याचा काय उपयोग ? त्या फळांच्या माराने तो अगदी गारद होऊन जमिनीवर पडला. इतक्यात ती मुलगी धावत आली आणि तिने गलिव्हरला उचलून घेतले. हा असा अचानक फळांचा वर्षाव होण्याचे कारण काही तिच्या लक्षात येईना. तिने इकडे तिकडे पाहिले. तेव्हा झाडाच्या मागल्या बाजूने उंच वाढलेल्या गवतातून लपत जाणारा खुजा खुषमस्कऱ्या

तिला दिसला. राणीने गलिव्हरच्या प्रेमाने त्या खुजाला राजवाड्यातून हाकलले होते. त्याचा सूड त्या खुजाने हा अशा प्रकारे घेतला होता. गलिव्हर झाडाखाली एकटाच उभा आहे असे पाहून त्याने ते झाड इतक्या जोराने गदागदा हालविले की, सटासटा सारी फळे गलिव्हरच्या अंगावर आपटली आणि बिचारा अगदी हैराण झाला. शेतकऱ्याच्या मुलीने त्याला राजवाडयात नेऊन त्याच्या खोलीत पलंगावर झोपविले. रात्रभर ती त्याच्याजवळ बसून राहिली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी तो जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा तिच्या जिवात जीव आला.

एकदा तो असाच गारांच्या तडाख्यात सापडला होता. प्राणावर बेतले होते, पण जखमी होण्यावर निभावले. गारांचा मारा गोफणीतून सुटलेल्या दगडांच्या मारासारखा असह्य होता. गारा सटासट अंगावर आदळू लागल्या, तसा चपळाई करून गलिव्हर रांगत रांगत एका दगडी बाकाखाली गेला. गारांचा वर्षाव थांबेपर्यंत तो तिथेच लपून राहिला.

एकदा नेहमीप्रमाणे गलिव्हर आपल्या रक्षिकेबरोबर बागेत गेला. उगीच ओझ्याचा त्रास नको म्हणून पिंजरा काही तिने घेतला नव्हता. बागेत नेहमीच्या जागेवर आल्यावर तिने त्याला खाली सोडले आणि स्वतः मैत्रिणीबरोबर गप्पा ठोकीत ठोकीत जरा दूर गेली. गलिव्हर आपल्या विचारमंथनात रंगून गेला होता. त्याची ही नेहमीची सवय होती. इतक्यात शेजारच्या बागेतला राखणदार कुत्रा उंच उडया घेत गालिव्हरपाशी आला. त्याने गालिव्हरला अलगद तोंडात धरले आणि आपल्या मालकापुढे नेऊन सोडले. हा भयंकर प्रकार पाहून गालिव्हरची तर शुद्ध हरपलीच होती, पण तो मालकही गोंधळून गेला. त्याने गालिव्हरला हातात घेऊन पाहिले, पण गालिव्हरला त्या कुत्र्याचे दात अजीबात लागले नव्हते. मांजरीचे दात जसे तिच्या पिलाला लागत नाहीत तसे त्या कुत्र्याचे दात गालिव्हरला मुळीच लागले नव्हते. गलिव्हर कुठे

दिसेना म्हणून घाबऱ्या घाबऱ्या आलेल्या शेतकऱ्याच्या मुलीने हा प्रकार जेव्हा पाहिला तेव्हा ती घाबरून गेली. तेव्हापासून तिने पिंजऱ्याशिवाय गालिव्हरला कुठे न्यावयाचे नाही असे अगदी ठरवून टाकले.

हा असा निश्चय करायला असाच आणखी एकदा एक प्रकार झाला होता. बागेत किडे टिपणारे पक्षी गालिव्हरला पाहून मुळीच भीत नसत. कधी कधी तर काही पक्षी त्याच्या हातावर झडप घालून त्याच्या हातातला फळांचा किंवा बिस्किटांचा तुकडा पळवीत. त्याने तो लपविण्याचा प्रयत्न केला तर पंखांचे फटके लगावून त्याला नको जीव करून टाकीत. असाच एकदा तो एका पक्ष्याच्या तावडीत सापडला असता त्या शेतकऱ्याच्या मुलीनेच त्या पक्ष्याला उडवून लावले होते.

गलिव्हर आपली हकीकत राणीला सांगत असे तेव्हा त्याने केलेल्या समुद्रपर्यटनाचीही माहिती तो देत असे. कधी कधी तो उदासीन दिसला म्हणजे त्याचे मन खुलविण्यासाठी राणी त्याला म्हणायची, 'तुझ्यासाठी छोटी नाव करू या. नौकानयनाचा व्यायाम तुझ्या तब्येतीला चांगला मानवेल.' पण इतकी छोटी नाव त्या देशातल्या नदीत राहणे मोठे कठीण होते. तरी राणीने अशी नाव तयार करण्याचा हुकूम कारागिराला दिला. आठ-दहा दिवसांमध्ये आठ-दहा माणसे बसू शकतील अशी सुंदर विलासनौका तयारही केली त्या कारागिराने. राणीला ती नाव फार आवडली राजाला तिने ती नाव नेऊन दाखविली. राजाने पाण्याच्या हौदात गलिव्हरसह ती नाव सोडण्यास सांगितले. पण वल्हे मारण्याइतकी त्या हौदात पुरेशी जागा नव्हती. त्यामुळे तो बेत रहित केला. राणीने अगोदरच योजना आखली होती. तीनशे फूट लांब, शंभर फूट रुंद असा एक मोठा हौद तयार करून घेण्यात आला होता. तो बाहेरच्या आवारात भिंतीलगत ठेवण्यात आला होता. दोन नोकर अर्ध्या तासात तो पाण्याने भरीत. पाणी सोडून देण्यासाठी त्याला तोटया बसविण्यात

आल्या होत्या. त्या हौदातले गलिव्हरचे नौकानयन म्हणजे आता एक नवा मनोरंजनाचा विषय झाला होता. त्या नावेचे शीड उभारले की दोन दासी पंख्याने वारा घालीत आणि जहाज चालू लागे. कधी कधी तर काही नोकर नुसता फुंकर घालून जहाज चालू करीत. वल्हे मारणे, सुकाणू धरणे ही कामे गलिव्हर तेवढा करीत असे. नौकानयन झाले की ते जहाज बाहेर काढून ठेवण्यात येत असे.

एकदा गलिव्हर मोठ्या भाग्याने एका अपघातातून वाचला. नेहमी-प्रमाणे त्याची ती क्रीडानौका एका दासीने हौदात ठेवली आणि गलिव्हरला त्या नौकेत ठेवण्यासाठी तिने हातात घेतले. पण अनवधानाने गलिव्हर तिच्या हातातून निसटला. एवढया मोठ्या उंचीवरून, म्हणजे चाळीस फुटांवरून खाली आदळून त्याचा कपाळमोक्षच व्हायचा. पण तिच्या छातीवरच्या झग्यावर टाचणी अडकवली होती, त्या टाचणीत गलिव्हरचा पट्टा अडकला आणि तो हवेत लोंबकळत राहिला. शेतकऱ्याची मुलगी धावत आली आणि तिने त्याची सुटका केली.

खरा आणीबाणीचा प्रसंग आला होता तो गलिव्हर एका माकडाच्या तावडीत सापडला होता तेव्हा. उकडत असल्याने गलिव्हरच्या खोलीच्या खिडक्या उघडया ठेवल्या होत्या. गलिव्हर एका खिडकीशी खुर्चीवर बसून राहिला होता. इतक्यात धपकन् काही तरी पडल्याचा आवाज झाला म्हणून गलिव्हरने खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले. राजवाडयाच्या वरच्या गोल खिडकीतून उडी घेऊन एक मोठे वानर कोणी नाही असे पाहून त्या महालात आले होते. गलिव्हरने हत्तीसारख्या त्या प्रचंड वानराला पाहताच झटकन तोंड आत घेतले. पण तेवढयात त्या वानराने त्याला पाहिलेच. ते झपाझप उड्या घेत गलिव्हरच्या खोलीजवळ आले. चहू-कडून डोकावून पाहू लागले ते. मागे मागे सरून लपता लपता त्याला ती खोली अपुरी पडू लागली. शेवटी हताश होऊन तो एका ठिकाणी

हातपाय आखडून घेऊन बसला. पण काही उपयोग झाला नाही. त्या वानराने उघडया दारातून हात घालून गलिव्हरच्या कोटाचे टोक पकडले आणि त्याला फर्रकन् बाहेर ओढून घेतले. गलिव्हरने त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी थोडीशी धडपड करून पाहिली. तो जितका हातपाय हालवायचा तितके ते माकड त्याला जास्तच आवळून धरायचे. तेव्हा आता जे काय नशिबी असेल ते होईल असा विचार करून गलिव्हरने आपली धडपड थांबविली. तेव्हा मात्र त्या वानराने त्याला छातीशी घेऊन आपल्या हाताने अलगद थोपटले. त्या वानराला गलिव्हर आपल्या पिल्लाप्रमाणे वाटत होता.

एका हाताने गलिव्हरला घेऊन ते वानर तीन पायांवर उडया घेत राजवाडयातून बाहेर पडले. त्याच्या छातीशी खाली पडण्याच्या भीतीने बिलगलेल्या गलिव्हरला पाहून राजवाडयातले सगळे नोकर लोक आरडा-ओरड करू लागले. तसे ते वानर धावत धावत खांबावर चढले. इतर लोकही त्याच्यामागे धावत सुटले. खांबावरून झटकन ते वानर उंच वाडयांच्या छपरावरून उडया घेत चालले. लोकांना खाली रस्त्यावर उभे राहून त्याच्याकडे पाहण्याखेरीज दुसरा काही मार्ग राहिला नाही. लोक ओरडण्याखेरीज आता काही करणार नाहीत अशी खात्री झाल्यावर ते वानर एका वाडयाच्या शिखरावर बसून गलिव्हरला बळेच काही खाऊ घालीत होते.

राजवाडयातून गलिव्हरला घेऊन वानर पळाले, ही वार्ता सगळीकडे पसरली. ती शेतकऱ्याची मुलगी तर पार घाबरून गेली. तिने धावत जाऊन सारा प्रकार राणीला सांगितला. राणीने राजाला सांगितले. राजाने सेनापतीला हुकूम करून सैन्य आणविले. सैन्याने चहूकडून वेढा घातला. शिडया लावून लोक घराघरांवर चढले. भोवतालच्या सर्व घरांवरून उडया घेत सारे सैनिक ते वानर ज्या वाडयावर बसले होते त्या

वाड्याकडे येऊ लागले. खाली रस्त्यावर ही गर्दी जमली होती. लोक वानराला दगड मारू लागले. पण कदाचित गलिव्हरला दगड लागेल ह्या भीतीने 'दगड मारू नका' अशी राजाज्ञा सगळीकडे फर्माविली गेली. खाली लोक उभे असलेले, वरील बाजूस सैनिकांचा वेढा पडलेला. आता आपण सुटत नाही असे पाहून त्या वानराने खुशाल आपल्या हातातून गलिव्हरला सोडून दिले. त्या वाड्याच्या उतरत्या शिखरावरून गलिव्हर घरंगळत खाली येत होता. सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. हजारो फुटांवरून तो खाली येत होता. जर का तो रस्त्यावर पडला असता तर तो क्षण त्याच्या आयुष्यातला शेवटचाच ठरला असता. ती शेतकऱ्याची मुलगी तर त्या वाड्याच्या शिखराकडे पाहत सैरावैरा धावत होती. तिचा जीव भीतीने अगदी उडून गेला होता. तो गलिव्हर-पाशी गुंतला होता. आणि म्हणूनच की काय, त्या वाडयाच्या उतरत्या मनोऱ्यावरून सटकन निसटलेला गलिव्हर अलगद गुलमोहराच्या फुला-प्रमाणे तिच्या हातात येऊन पडला. सगळ्यांना हायसे वाटले. आनंद झाला. गलिव्हर वाचला. त्या सैनिकांनी त्या वानराला ठार केले.

आपल्या छातीशी गलिव्हरला हळुवारपणे धरून शेतकऱ्याची मुलगी राजवाडयात परत आली. बोक्याने पळविलेला पिंजऱ्यातला राघू परत सुरक्षितपणे पिंजऱ्यात आलेला पाहून घरातल्या सर्व लोकांना जो आनंद होतो तोच आनंद आता साऱ्या राजवाडयात भरून राहिलेला होता.

काही दिवस गलिव्हर आजारीच होता. त्या मुलीच्या प्रेमळ शुश्रूषे-मुळे आठचार दिवसांत तो पुन्हा हिंडू-फिरू लागला.

गलिव्हर आपल्या अंगच्या कलेच्या प्रदर्शनाने राजाची आणि राणीची चांगली करमणूक करीत असे. एकदा राजाचे केस कापण्यासाठी न्हावी आला होता. बाहेरच्या बाजूला लांबलचक सतरंजी पसरून त्यावर हा सारा साप्ताहिक समारंभ चालला होता. बसलेला असूनही

वीस-पंचवीस फूट उंच असलेला राजाचा अवाढव्य देह. त्याची मान हातात आलेला न्हावीही त्याच मापाचा, आणि त्याच्या हातातला लाकडे कापण्याच्या करवतीच्या दुप्पट लांब असलेला वस्तरा, हे सारेच चित्र मोठे भव्य होते. त्याने कापलेले राजाच्या दाढीचे केस नारळाच्या झावळ्या तुटून पडाव्यात त्याप्रमाणे खाली पडत होते. ते पाहून गलिव्हरच्या मनात एक कल्पना आली. त्याने सुताराकडून काही फळ्या रंधून घेतल्या. त्यांना भोके पाडून त्यात हे केस खोचून मोठमोठे ब्रश त्याने तयार केले. वेताच्या खुर्च्या असतात त्याप्रमाणे काही खुर्च्या तयार करून त्यांमध्ये वेताच्या पट्ट्यांऐवजी राजाच्या डोक्याचे लांब लांब केस त्याने विणले. राजाराणीला त्याच्या ह्या साऱ्या कलाकृती फार म्हणजे फारच आवडल्या. त्यांनी गलिव्हरच्या ह्या वस्तूंचे राजमहालात कायम स्वरूपाचे एक प्रदर्शनच मांडून ठेवले होते.

त्याने आपले वाद्यवादन कौशल्यही राजाला दाखविले. राजवाड्यात एक मोठी सतार होती. मोठी म्हणजे किती? चाळीस फूट लांबीची. हातात घेऊन ती सतार वाजविणे ही गोष्ट तर अशक्यच होती. तेव्हा गलिव्हरने तितक्याच लांबीचा एक बाक तयार करून घेतला. दोन, चार चार फूट लांबीच्या काठ्या त्याने तयार करून घेतल्या होत्या. जमिनीवर आडव्या ठेवलेल्या सतारीशेजारी त्याने तो बाक ठेवला बाकावरून इकडे तिकडे धावाधाव करून हातातल्या काठ्यांनी तो त्या सतारीच्या तारा छेडीत असे त्या नादमाधुर्याने तो सारा राजवाडा भारला जात असे आणि त्याचे ते अप्रतिम कौशल्य पाहून राजघराण्यातली ती सारी माणसे भारली जात असत. ती त्याला पुन्हा पुन्हा सतारवादनाचा आग्रह करीत असत. पण तो मात्र अगदी दमून जात असे.

राजा गलिव्हरच्या कलेवर मोहित होता. त्याची विद्वत्ता, त्याचे संभाषणचातुर्य पाहूनही तो संतुष्ट होत असे. इंग्लंडची लोकशाही,

इंग्लंडची न्यायदानपद्धती, इंग्लंडचे शिक्षणकार्य वगैरे विषयांवर गलिव्हर तासन् तास बोलत बसत असे आणि राजा आश्चर्यमुग्ध होऊन ह्या छोट्या वाचि-वीराचे वाक्चातुर्य ऐकत बसत असे. ह्या संभाषण कार्य-क्रमाच्या वेळेस राजापुढे गलिव्हर पंचवीस फूट उंचीच्या टेबलावर बसत असे, तेव्हा कुठे खाली बसलेल्या राजाच्या कानापाशी त्याचे तोंड येत असे आणि गप्पा सुलभतेने होत असत.

'इंग्लंडमध्ये सरदार घराण्यातील लोक राजकारणात भाग घेतात. लोकांचे प्रतिनिधी मतदान पद्धतीने निवडले जातात. सरदार आणि लोकप्रतिनिधी यांची पार्लमेंट होते आणि पार्लमेंटच्या सहाय्याने राणी राज्यकारभार करते. न्यायदानपद्धती अतिशय व्यवस्थित आहे. वकिलांच्या मार्फत सामान्य लोक कोर्टकचेऱ्यांत तक्रारी दाखल करतात आणि न्याय मिळवतात. धर्मगुरू साप्ताहिक प्रार्थना करतात, लोकांना धर्ममार्ग दाखवितात. मुलांच्या शिक्षणाची इंग्लंडमध्ये फार उत्तम सोय आहे. देशाच्या विकासासाठी, रक्षणासाठी योग्य असे तरुण इंग्लंडच्या शाळांमधून तयार होतात' वगैरे विशेष गोष्टी गलिव्हरने राजाला सांगितल्या.

राजा जरा बेतानेच हसला; कारण आपल्या हसण्याच्या दणदणाटाने बिचारा गलिव्हर घाबरून खाली पडला असता, हे तो जाणत होता. तो हलक्या आवाजात गलिव्हरला म्हणाला, 'तुमचे सरदार म्हणजे आयत्या पिठावर रेघोट्या ओढणारे दिसतात. लोकांनी निवडलेले प्रतिनिधी पैशाच्या जोरावर निवडून आलेले असायचे. त्यांच्या मदतीने राज्यकारभार करणारी राणी म्हणजे फक्त सहीची धनीण असणार. वकील म्हणजे जिथे जास्तीत जास्त पावित्र्य पाहिजे त्या न्यायमंदिराला अपवित्र करणारे न्यायाचे दलाल. साप्ताहिक प्रार्थनेसारखी धर्माची दुसरी थट्टा नाही. राष्ट्राच्या विकासासाठी तरुण तयार करणाऱ्या तुमच्या शाळा म्हणजे मोठे कारखानेच दिसतात. मुलांच्या विकासा-

साठी शिक्षण असते, हे तुमच्या गावीही दिसत नाही. स्वार्थ, खोटेपणा, कृत्रिमता, लबाडी अशा दुर्गुणांनी भरलेले तुमच्यासारखे क्षुद्र प्राणी म्हणजे ह्या जगाला मिळालेला शापच आहे. नशीब तू इकडे आलास म्हणून त्या पापी लोकांपासून काही काळ तरी दुरावलास.'

ह्या कार्यक्रम झाला म्हणजे मग गलिव्हर आपल्या खोलीत जात असे.

आपण सांगितलेल्या इंग्लंडप्रशस्तीवर राजाने दिलेला शेरा ऐकून गलिव्हरला राग आला. पण कृतज्ञता आणि भीती ह्या दोन गोष्टींमुळे तो आपला राग व्यक्त करू शकला नाही. मात्र आपल्या देशाविषयीचा राजाचा गैरसमज काढून टाकण्याचे त्याने ठरविले होते.

त्यासाठी त्याने युरोपमधील शास्त्रीय शोधांची माहिती आणि महती राजाला सांगितली. बंदुकीची दारू, बंदुकी, तोफा, बॉम्बगोळे ह्या एकाचढ एक विध्वंसन साधनांचे वर्णन ऐकून राजा अगदी स्तिमित झाला. बंदुकीची एक गोळी माणसाला यमसदनाला पाठवू शकते, तोफेतून सुटलेला गोळा प्रचंड जहाजाला जलसमाधी देऊ शकतो आणि बॉम्बगोळ्यांचा वर्षाव गावेच्या गावे बेचिराख करू शकतो, हे सारे गलिव्हरने सांगितले तेव्हा राजाला तर घाम फुटला. पाचसहा नोकर मोठमोठे टॉवेल घेऊन राजाचा घाम पुसू लागले. ते घाम पुशीत असताना राजा गलिव्हरला म्हणाला, 'तुम्ही तुमचा, तुमच्या घरादारांचा नाश करण्यात मात्र चांगलं डोकं चालविलं आहे.'

राजाला हे विध्वंसन-शास्त्र अजिबात मानवले नाही. माणुसकी, दया, प्रेम अशा ठोकळ तत्त्वांवर त्याची सारी राजनीती आधारलेली होती. त्यामुळे गलिव्हरने सांगितलेले सुधारलेल्या जगाचे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि युद्धशास्त्र अजिबात त्याला समजले नाही. त्याचे संशोधन, त्यांचे शिक्षण, वाङ्मय सारेच काही मर्यादित, सरळ, साधे.

राजाचे ग्रंथालय एका प्रशस्त दिवाणखान्यात होते. ग्रंथसंख्या अवघी दीडशे ते दोनशे. हेच काय ते राज्यातले सर्वश्रेष्ठ ग्रंथालय होते. गलिव्हरने त्याची एकदा पाहणी केली. गड्याने त्याच्यासाठी काही ग्रंथ भिंतीला टेकवून उघडून ठेवले. एक एक ग्रंथ पंधरावीस फूट उंचीचा आणि चार-पाच फूट रुंदीचा. त्या ग्रंथाला टेकून एक शिडी ठेवण्यात आली होती त्या शिडीवर चढून गलिव्हरने ग्रंथवाचन केले. त्या ग्रंथांमध्ये क्लिष्टता, अनावश्यक वर्णने, अलंकारिक रचना वगैरे काही नव्हते. सरळ, साध्या विचारांचे सोप्या भाषेत मुद्देसूद निवेदन त्यात केले होते.

अशा ह्या साध्या प्रेमळ राजाकडून कदाचित आपणास आपले स्वातंत्र्य परत मिळेल अशी स्वप्ने गलिव्हर पाहत होता.

राजाने व राणीने गलिव्हरला उत्तम वागणूक दिली. त्याची सर्व प्रकारची काळजी घेतली जात होती. उत्तम बडदास्त ठेवली जात होती त्याची. तसे त्याला काहीच कमी नव्हते. कमी होते ते स्वातंत्र्य !

पिंजऱ्यातला पक्षी होऊन राहणे, सर्वांच्या करमणुकीचा विषय होणे त्याला आवडत नव्हते. आवडत होते ते स्वातंत्र्य ! ते मिळविण्याची संधी तो पाहत होता. योगायोगाने अशी एकदा संधी आली.

एकदा राजाची मोहीम दक्षिण किनाऱ्याला निघाली. राणीही बरोबर होती. आणि राजाराणीचा आवडता गलिव्हर आणि त्याची ती संरक्षिका शेतकऱ्याची मुलगी ह्यांनाही त्यांनी बरोबर नेले होते. नेहमीप्रमाणे त्यांनी गलिव्हरला त्याच्या त्या लाकडी पेटीतून नेले होते. त्याची ही पेटी एका घोडेस्वाराने एका घोड्यावरून चालविली होती.


सागर किनाऱ्यापासून सतरा-अठरा मैलांवर राजाचा एक राजवाडा होता. त्या राजवाड्यामध्ये ह्या साऱ्या लवाजम्याचा मुक्काम पडावयाचा होता. तो वाडा आला तेव्हा दोन चार दिवसांचा त्यांचा प्रवास संपला. नोकर-चाकरांनी सारी व्यवस्था केलीच होती. सर्व सामानसुमान लावले

गेले. एका प्रशस्त महालात गलिव्हरचा लाकडी पिंजरा ठेवण्यात आला. राजाराणी आपआपल्या महालात गेले. गलिव्हरच्या त्या लाकडी पिंजऱ्याच्या सगळ्या खिडक्या उघड्या ठेवल्या होत्या आणि तो पिंजरा महालाच्या पश्चिमेकडील खिडकीपाशी ठेवला होता. त्या खिडकीतून दूर क्षितिजावर फेसाळणारा सागर दिसत होता. तो पाहताच गलिव्हरचे सागरप्रेम उचंबळून आले. सागरकिनाऱ्यावर जाण्यासाठी त्याचा जीव तडफडू लागला. पण त्याची दाई, ती शेतकऱ्याची मुलगी आजारी पडल्याने त्याचा अगदी नाइलाज झाला. तोही थोडा आजारी होता. थोडेसे ढोंग केले त्याने जास्त आजाराचे; आणि बाहेर मोकळ्या हवेत गेल्याशिवाय आपल्याला बरेही वाटायचे नाही अशी त्याने आपल्या दाईची खात्री केली. शेवटी एका मुलाबरोबर गलिव्हरला समुद्रकिनाऱ्यावर पाठविण्यास तिने मान्यता दिली.

त्या मुलाला देखील समुद्रकिनाऱ्यावर भटकायला हवेच होते. त्याने गलिव्हरची पेटी उचलली आणि तो चालू लागला. तो बाहेर पडेपर्यंत ती मुलगी त्याला बजावून बजावून गलिव्हरची काळजी घ्यायला सांगत होती आणि तो हो, हो म्हणत घाईने काढता पाय घेत होता. गलिव्हरच्या दृष्टीने सतरा-अठरा मैल म्हणजे त्या राक्षसी मुलाच्या दृष्टीने पाचदहा मिनिटांची चाल. हां हां म्हणता तो खडकाळ समुद्रकिनाऱ्यावर येऊन पोहोचला. मध्ये एका खडकावर त्याने गलिव्हर असलेली पेटी ठेवली आणि तोही एका खडकावर समुद्रशोभा पाहत बसला. गलिव्हरने खडकावर आदळणाऱ्या सागराच्या फेसाळ लाटा मनसोक्त पाहून घेतल्या. थोड्या वेळाने मात्र सागरावरून येणारा गार खारा वारा त्याला सहन होईना. त्याने खिडकी आतून लावून घेतली आणि शांतपणे बिछान्यावर पडून राहिला.

तो मुलगा शांतपणे एके ठिकाणी थोडाच बसून राहणार ! खडकांच्या खाचांतून असलेली पक्ष्यांची अंडी पाहत पाहत तो गलिव्हरच्या पेटी-

पासून बराच दूर गेला. इतक्यात एक प्रचंड गरुडपक्षी तीरासारखा येऊन त्या पेटीपाशी उतरला. त्याने इकडून तिकडून झेपा घेत ती सारी पेटी न्याहाळली. हा एखादा कासवासारखा कवचधारी प्राणी असावा अशी त्याची समजूत झाली. उंचावर नेऊन खाली खडकावर ह्या प्राण्याला सोडावे, म्हणजे त्याचे कवच फुटेल आणि आपल्याला त्याचे मांस खावयास मिळेल, असा त्या गरुडाने विचार केला. त्या पेटीला वरच्या बाजूस मुद्दाम कडी केलेली होती. ती चोचीमध्ये धरून त्या पेटीसह तो गरुडपक्षी उंच आकाशात उडाला.



धरणीकंप झाल्याप्रमाणे सारी पेटी हादरल्याने गलिव्हर जागा झाला. खिडकीच्या काचेतून तो पाहू लागला. सगळीकडे निळे आकाश दिसत होते. मधून मधून काळे पांढरे ढग दिसत होते. हा सारा प्रकार पाहून गलिव्हर आश्चर्यचकित झाला. नंतर लक्षपूर्वक ऐकल्यावर पंखांची फडफड

त्याच्या कानांवर आली. मग त्याला कळून चुकले की, एखाद्या प्रचंड पक्ष्याच्या तावडीत आपण सापडलो आहोत.

तो गरुड पक्षी गरुड-भरारीने गगनसंचार करीत होता. त्याला पेटी घेऊन जात असलेला पाहताच इतर दोन तीन गरुड पक्ष्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला. समुद्रावरून हा पाठलाग सुरू झाला. किनारा मागे पडला. खाली अथांग निळा सागर आणि वर अफाट निळे नभ ह्याखेरीज दुसरे कशाचेच दर्शन होत नव्हते. पाठलाग करणाऱ्या पक्ष्यांनी त्या पहिल्या गरुडाला अगदी गाठले होते. तोच त्याने आपल्या चोचीतली ती पेटी सोडून दिली.

पेटी वेगाने खाली येत होती. गलिव्हरची आता खात्री झाली की, ही पेटी आता जोरात खाली आदळणार आणि आपण मृत्युमुखी पडणार. आता त्याला त्याच्या दाईची, राजाची आणि राणीची आठवण होऊ लागली, आणि वाईट वाटू लागले. नशीब त्याचे, की ती पेटी एखाद्या खडकावर पडून फुटली नाही. ती पाण्यात पडून तरंगू लागली. तात्काळ मृत्यू आला नाही, मृत्यू थोडा दुरावला एवढेच गलिव्हरला समाधान लाभले. आता किती काळ ही पेटी अशी तरंगत राहील आणि केव्हा काळाच्या दाढेत ओढली जाईल याचा काहीच नेम नव्हता. इतक्यात खरोखरच त्या पेटीला एकदम झटका बसला. कोणी तरी पेटी वर ओढीत आहे, असे गलिव्हरला वाटले. मनात आशेची पणती मिणमिणली. पेटीचे वरचे झाकण बाजूला सारून पाहण्याचे त्याने ठरविले. वरच्या फळीला एक भोक करून घेतले होते आणि त्याला आतून एक सरकते झाकण बसवले होते. ते बाजूला केले तर आत पाणी येईल अशी भीती वाटत होती; तरी गलिव्हरने धाडस केले आणि झाकण बाजूला केले, पाणी आत आले नाही. पेटी पाण्याच्या वर आली होती आणि कडीत अडकवलेल्या दोरीने ती वरवर ओढली जात होती, हे त्याच्या लक्षात

आले. गलिव्हरला अत्यानंद झाला. एखाद्या नावेएवढी ती पेटी काही सहजासहजी ओढली जात नव्हती. ओढणाऱ्यांना फार प्रयास पडत होते हे गलिव्हरला स्पष्ट दिसत होते. त्याने ताबडतोब त्याच्या टेबला-च्या खणात असलेली छोटीशी कुऱ्हाड घेतली आणि त्या वरच्या लाकडी तक्तपोशीवर घाव मारायला सुरुवात केली. थोडया वेळात त्या भोकाबाजूचे थोडेसे लाकूड उडवले गेले. बाहेर पडता येईल एवढी मोठी जागा तयार झाली. लगेच त्या कुऱ्हाडीसह गलिव्हर त्या पेटीच्या बाहेर पडला. झटकन त्याने एका हाताने दोरी पकडली आणि दुसऱ्या हाताने कुऱ्हाडीच्या एकाच फटक्यात त्या पेटीच्या कडीला बांधलेली दोरी तोडून टाकली. ती पेटी – गलिव्हरचे दोन वर्षांचे ते निवासस्थान – ताबडतोब सागरतळाला गेले आणि गलिव्हर सहज ओढला गेला. त्या जहाजाकडे त्याचे लक्ष गेले. त्याला फार आनंद झाला. त्या जहाजावर युनियन जॅक फडकत होते. गलिव्हर लगेच त्या जहाजाच्या डेकवर उतरला.

ते इंग्लंडचे जहाज होते आणि इंग्लंडलाच चालले होते ते. कप्ता-नाने चौकशी केली. गलिव्हरने आपली सारी हकीकत सांगितली. त्या कप्तानाने मोठ्या आनंदाने गलिव्हरला मायदेशी नेण्याचे कबूल केले.

सात-आठ दिवसांतच ते जहाज इंग्लंडच्या किनाऱ्याला लागले. डाउन्स बंदरात जहाज नांगरले गेले. कप्तानाचा निरोप घेऊन आणि त्याचे आभार मानून गलिव्हर जहाजावरून उतरला आणि आपल्या गावी गेला. आपल्या गावात, आपल्या घरात, आपल्या माणसांत आल्याचा केवढा आनंद गलिव्हरला झाला होता. तो आपल्या पत्नीला म्हणाला सुद्धा, 'आता नाही आपण घर सोडून जाणार.'

तेव्हा त्याची पत्नी हसून म्हणाली, 'कुणास ठाऊक, पुन्हा कशी लहर फिरेल ती!'

2C32